# प्रकरण चौथे

# परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन

## ४.१ प्रस्तावना :

आदिवासी समाज हा एक प्राचीन काळापासून उपेक्षित जीवन जगणारा समाज म्हणून ओळख आहे. वनात, जंगलात, दऱ्या-खोऱ्यात आणि डोंगराच्या साह्याने त्याची स्वतःचे स्वतंत्र्य अबाधित ठेवले. इतर समाजापासून आदिवासी समाज लांब असल्याने हा समाज आत्मकेंद्रित बनला. अशा अलिप्तपणामुळे त्यांने स्वतःची संस्कृती टिकवून ठेवली असली तरी, त्यांचा विपरीत परिणाम त्यांच्या दूरगामी विकासावर झाल्याचे ठळकपणे दिसून येते. मर्यादित भूप्रदेश, मर्यादित तंत्रविद्या, साधी अर्थव्यवस्था, विशिष्ट भाषिक गट इ. वैशिष्ट्यामुळे आदिवासी समाज इतर समाजापेक्षा सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच सामाजिक दृष्ट्या मागासलेपणा दिसून येतो.

खरे तर आदिवासी या देशातील मूळनिवासी असून आर्य भारतात येण्याआगोदर आदिवासी हे सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या संपन्न होते. परंतु आर्य आल्यानंतर त्यांच्याशी होत असलेल्या नेहमीच्या संघर्षामुळे आदिवासींना त्यांचे स्वातंत्र्य जीवन जगण्यासाठी वनात, जंगलात, डोंगर दऱ्याचा आश्रय घ्यावा लागला. त्यामुळे आदिवासींच्या असलेल्या सुपिक जमीनीवर आणि संपन्न नगरीवर आर्यांनी वर्चस्व प्रस्तापित केल्यामुळे आदिवासींच्या विपन्नवस्थेला सुरुवात झाली.

मध्यंतरीच्या काळात अनेक राज सत्तांचा उदय आणि शेवट झाले. परंतु त्यांचा आदिवासींच्या सांस्कृतिक स्वातंत्र्यावर आणि सामाजिक जीवनमानावर फारसा परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. परंतु ब्रिटिशांच्या काळात आदिवासी समाजाचे जीवन ढवळून निघाले. कारण ब्रिटिशांनी राज्यकारभाराकरिता आर्थिक जीवनात ढवळा ढवळ केल्याने आदिवासींच्या अलग व अलिप्तपणावर आघात होऊ लागला. त्यामुळे भारतीय समाज

सुधारकांना आदिवासींच्या परिस्थितीचा विचार करण्याची गरज निर्माण झाली. खिश्चन मिशनच्या नंतर समाजसुधारक, ब्रिटिश सनदी अधिकारी आणि मानववंशशास्त्रज्ञ यांचा आदिवासींचा संपर्क आला. जनगणना करणाऱ्या तत्कालिन अधिकाऱ्यांना आदिवासींची गणना कोणत्या वर्गात करावी आणि त्यांना कोणत्या नावाने ओळखावे असा प्रश्न निर्माण झाला. कारण ते हिंदू आहेत असे कोणी मानले नव्हते. आदिवासींचे सांस्कृतिक व धार्मिक जीवन हिंदूपेक्षा वेगळे आहे. त्यानंतरच्या कालावधीत हिंदू आणि आदिवासी यांच्यामधील असलेले आगोदरचे सामाजिक दुरत्व कमी होऊ लागल्यामुळे त्यांना हिंदू धर्माचे आचरण करणारे 'वन्य जमाती' अशा नावाने ओळखले गेले. सामाजिक मानववंश शास्त्रज्ञानी आदिवासी जमातींचे वर्णन भौगोलिक व सांस्कृतिक विभिन्नतेद्वारे केले. आदिवासी जमातीचा हिंदू समाजाशी येत असलेल्या संपर्कामुळे या जमाती स्वतःला जमाती म्हणून घेतात असे निर्देशनास आले.

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाज सामाजिक दृष्ट्या अस्पृश्य समाज नसून तिरस्कार करणारा एक समाज आहे. याचे कारण अर्थातच सामाजिक सांस्कृतिक तसेच आर्थिक मागासलेपणा होय. आदिवासी समाज आज महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात असून त्यांची संख्या ४७ एवढी दिसून आले आहे.

**४.२ कुटुंब पध्दती संबंधीत माहिती :**

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील कुटुंब पध्दतीची पाहणी करण्यात आली असून या पाहणीत असे दिसून आले की, जिल्ह्यातील बहुतांशी आदिवासी कुटुंबे ही विभक्त असल्याचे दिसून आले. हे खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्र ४.१**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील कुटुंब पध्दतीची स्थिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | संयुक्त कुटुंब पध्दती | विभक्त कुटुंब पध्दती | एकूण कुटुंबांची संख्या |
|---|---|---|---|
| जिंतूर | १६ (४.४४) | २४ (६.६६) | ४० (११.११) |
| सेलू | १९ (५.२७) | २१ (५.८३) | ४० (११.११) |
| मानवत | २२ (६.११) | १८ (५.००) | ४० (११.११) |
| पालम | १४ (३.८८) | १६ (४.४४) | ४० (११.११) |
| पूर्णा | १८ (५.००) | २२ (६.११) | ४० (११.११) |
| गंगाखेड | १९ (५.२७) | २१ (५.८३) | ४० (११.११) |
| सोनपेठ | १७ (४.७२) | २३ (६.३८) | ४० (११.११) |
| पाथरी | २० (५.५५) | २० (५.५५) | ४० (११.११) |
| परभणी | २२ (६.११) | १८ (५.००) | ४० (११.११) |
| एकूण | १६७ (४६.३९) | १९३ (५३.६१) | ३६०(१००) |

**स्त्रोत -** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील कुटुंब पध्दती दर्शविण्यात आली आहे. नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी १६७ आदिवासी कुटुंबामध्ये संयुक्त कुटुंब पध्दती असून त्याची टक्केवारी ४६.३९ एवढी आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक संयुक्त कुटुंब पद्धती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २२ (६.११ टक्के) असून ते प्रत्येकी मानवत आणि परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी संयुक्त कुटुंब पध्दती असणाऱ्या

आदिवासी कुटुंबांची संख्या १६ (४.४४ टक्के) असून ते जिंतूर तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी विभक्त कुटुंब पध्दती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १९३ असून त्याची टक्केवारी ५३.६१ टक्के एवढी आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक विभक्त कुटुंब पध्दतीने राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २४ (६.६६ टक्के) असून ते जिंतूर तालुक्यातून आढळून आले आहे. सर्वात कमी विभक्त कुटुंब पध्दतीने राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १८ (५.०० टक्के) असून ते मानवत आणि परभणी तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात विभक्त राहण्याचे प्रमाण आदिवासी समाजात अधिक दिसून येते. लग्न झाले की नवीन विवाहित काही कारणाने विभक्त राहण्याचा प्रयत्न करतात. सासू-सुनेचे पटत नसल्या कारणाने संयुक्त कुटुंबाचे विभाजन होत आहे. आधुनिक विचारसरणीचा प्रभाव आणि छोट्या कुटुंबाचे महत्त्व आदी कारणामुळे विभक्त कुटुंबपद्धतीचे प्राबल्य आदिवासी समाजात वाढत आहे.

**४.३ शैक्षणिक स्थिती :**

परभणी जिल्ह्यातील आदिवासी हे बहुतांश करून डोंगराळ व दुर्गम भागामध्ये वस्ती करून राहणारा एक समाज आहे. त्यामुळे आदिवासी लोकांचा इतर समाजाशी आणि जगाशी फार कमी प्रमाणात संपर्क येतो. तसेच डोंगरदऱ्यातील दुर्गम भागामध्ये शाळेची सोय नसल्यामुळे असतील तर इयत्ता प्राथमिक पर्यंतच शाळा असल्यामुळे इतर समाजामध्ये जसा शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार झाला आहे. तसा शिक्षणाचा प्रसार व प्रचार आदिवासी समाजामध्ये झालेला दिसून येत नाही.

भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर देशामधील सर्व जाती-जमातींच्या लोकांना शिक्षण देण्यासाठी शासकीय व निमशासकीय पातळीवर प्रयत्न सुरु झाले. तसेच या जमातीमधील निरक्षरता, रुढी-परंपरा, चालीरिती आणि अंधश्रध्दा यावर आघात

करण्यासाठी केंद्र व राज्यसरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने वेगवेगळया पातळीवर प्रयत्न करण्यात येत आहे. शिक्षणाच्या बाबतीत समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास योजना यांच्यामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने डोंगराळ व दुर्गम भागात आश्रमशाळा, वस्तीशाळा, निवासी वसतिगृह व शिष्यवृत्ती या सारख्या निरनिराळ्या शैक्षणिक सोयी सुविधामुळे आदिवासी समाज साक्षर होत असताना दिसून येते. याचाच परिणाम म्हणून आदिवासी समाजातील अलिकडच्या काळात साक्षरतेचे प्रमाण मंदगतीने वाढू लागले आहे. असे असले तरी इतर समाजाच्या तुलनेने आदिवासी समाज शैक्षणिक दृष्ट्या बऱ्याच प्रमाणात मागासलेला असल्याचे आढळून येते.

आदिवासी समाजातील बहुतांश लोक उदरनिर्वाहासाठी मजुरी आणि शेतीवर अवलंबून आहे. शेती आणि मजुरी करिता शिक्षणाची फारशी गरज भासत नसल्याने आदिवासी समाजातील शेतकरी व मजुरवर्गात शिक्षणाबाबत उदासिनता आहे. परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे शैक्षणिक दृष्टीकोनातून अध्ययन पुरुष साक्षरता, स्त्री साक्षरता, मुलींची साक्षरता आणि मुलांची साक्षरता असे चार भागात विश्लेषण केले आहे. तसेच परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या साक्षरतेचे परभणी जिल्हा आणि महाराष्ट्र राज्याच्या साक्षरतेशी तैलाणिक अभ्यास केलेला आहे.

**४.३.१ आदिवासी पुरूषांची शैक्षणिक स्थिती :**

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील निवडक नमुना कुटुंबाचा शैक्षणिक दृष्टीकोनातून अभ्यास केला असला पुरूषांची शैक्षणिक स्थिती खालील प्रमाणे आढळून आली आहे.

## तक्ता क्र. ४.२

## परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांतील पुरूषांची शैक्षणिक स्थिती

| तालुका | शैक्षणिक स्तर | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | पदव्युत्तर | व्यावसायिक |
| जिंतूर | २३ (४.४२) | १५ (२.८८) | ०७ (१.३४) | ११ (२.११) | ०५ (०.९७) | ०३ (०.५७) | ०१ (०.२०) |
| सेलू | ३८ (७.३०) | १२ (२.३०) | ०६ (१.१५) | ०३ (०.५७) | ०१ (०.२०) | ०१ (०.२०) | ०० (००) |
| मानवत | ४१ (७.८९) | १३ (२.५) | ११ (२.११) | ०२ (०.३८) | ०३ (०.५७) | ०० (००) | ०१ (०.२०) |
| पालम | २६ (५.००) | १६ (३.०८) | ०५ (०.९६) | ०५ (०.९७) | ०१ (०.२०) | ०१ (०.२०) | ०० (००) |
| पूर्णा | २९ (५.५८) | ०९ (१.७३) | ०४ (०.७६) | ०४ (०.७६) | ०४ (०.७६) | ०२ (०.३८) | ०१ (०.२०) |
| गंगाखेड | २२ (४.२३) | ११ (२.११) | ०६ (१.१५) | ०३ (०.५७) | ०१ (०.२०) | ०१ (०.२०) | ०० (००) |
| सोनपेठ | ३१ (५.९६) | १३ (२.५) | १० (१.९२) | ०२ (०.३८) | ०२ (०.३८) | ०१ (०.२०) | ०२ (०.३८) |
| पाथरी | ३४ (६.५३) | १५ (२.८९) | ०८ (१.५३) | ०४ (०.७६) | ०१ (०.२०) | ०० (००) | ०० (००) |
| परभणी | २४ (४.६१) | १४ (२.७०) | ०६ (१.१५) | ०३ (०.५७) | ०१ (०.२०) | ०१ (०.२०) | ०० (००) |
| एकूण | २६८ (५१.५३) | ११८ (२२.७०) | ६३ (१२.११) | ३७ (७.११) | १९ (३.६५) | १० (१.९२) | ०० (००) |

**स्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.२ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील पुरूषांची शैक्षणिक स्थिती दर्शविलेली आहे. जिल्ह्यातील एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी पुरूषांची एकूण लोकसंख्या ५२० आहे. त्यापैकी निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या २६८ (५१.५३) टक्के एवढी आहे तालुकानिहाय अभ्यास

केला असता सर्वात जास्त निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील लोकांच्या सदस्यांची संख्या ४१ (७.८९ टक्के) असून ते मानवत तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या २२ (४.२३ टक्के) असून ते गंगाखेड तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ११८ (२२.७० टक्के) पुरूषांनी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या १६ (३.०८ टक्के) असून ती पालम तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या ०९ (१.७३टक्के) पूर्णा तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ६३ (१२.११ टक्के) पुरुषांनी माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या ११ (२.११ टक्के) असून ती मानवत तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या ०४ (०.७६ टक्के) पूर्णा तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ३७ (७.११ टक्के) पुरूषांनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या ११ (२.११ टक्के) असून ती जिंतूर तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या प्रत्येकी ०२ (०.३८ टक्के) असून ते मानवत, सोनपेठ तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील १९ (३.६५ टक्के) पुरूषांनी पदवी शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त पदवी शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबांतील सदस्यांची संख्या ०५ (०.९७ टक्के) असून ती जिंतूर तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी पदवी शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या प्रत्येकी ०१ (०.२० टक्के) असून ती सेलू, पालम, गंगाखेड, पाथरी आणि परभणी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील १० (१.९२ टक्के) पुरूषांनी पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या ०३ (०.५७ टक्के) असून ती जिंतूर तालुक्यातून आली आहे. तर सर्वात कमी पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या ०० (शून्य) असून ती मानवत, पाथरी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ०५ (०.९६ टक्के) पुरूषांनी व्यावसायिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या ०२ (०.३८ टक्के) असून ती सोनपेठ तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या ०० (शून्य) असून ती सेलू, पालम, गंगाखेड, पाथरी आणि परभणी तालुक्यातून आढळून आली आहे.

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या पुरूषांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी का आहे. याचे कारण शोधले असता असे निदर्शनास आले की, उच्च शिक्षण घेऊन सुद्धा नोकरी मिळत नाही. नोकरी मिळण्याकरिता द्यावा लागणरे डोनेशन, कमकुवत आर्थिक परिस्थिती, शिक्षणाविषयी असणारा उदासिन दृष्टिकोन आणि रोजगाराभिमुख

शिक्षणांचा अभाव आदी कारणांमुळे आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून आले आहे.

### ४.३.२ आदिवासी स्त्रियांची शैक्षणिक स्थिती :

देशातील लोकांची संस्कृती आणि सभ्यता ही देशातील महिलांच्या शैक्षणिक दर्जा आणि स्थिती यावर अवलंबून असते. महात्मा फुले याने महिलांच्या शिक्षणाच्या संबंधी 'एक पुरुषांचे शिक्षण हे बहूधा त्यांच्या एकट्याचे ठरते. परंतु एका महिलांचे शिक्षण मात्र भावी पिढीचे शिक्षण ठरते.'असे मत व्यक्त केले. तसेच नेपोलियन यांनीही महिला शिक्षणाबाबत असे मत मांडले आहे की, 'मुलांच्या शिक्षणापेक्षा मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे. कारण एक मुलगी शिकली तर तिच्याद्वारे एक कुंटुब सुशिक्षित होते' वरील वाक्यावरुन असे निर्देशनास येते की, शिक्षणात महिलांच्या शिक्षणाला विशेष महत्त्व असल्याचे दिसून येते.

परभणी जिल्हयातील आदिवासी समाजातील निवडलेल्या ३६० कुटुंबातील ५०९ स्त्रियांच्या निरक्षता आणि साक्षरतेचे विविध शैक्षणिक स्तरानुसार वर्गीकरण केले असता आदिवासी स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण अल्प असल्याचे दिसून आले. हे खालील तक्त्यामध्ये दाखविले आहे.

**तक्ता क्र. ४.३**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांतील स्त्रियांची शैक्षणिक स्थिती**

| तालुका | शैक्षणिक स्तर | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | पदव्युत्तर | व्यावसायिक |
| जिंतूर | ३९ (७.६६) | १३ (२.५५) | ०४ (०.७८) | ०३ (०.५८) | ०१ (०.१९) | ०० (००) | ०१ (०.१९) |
| सेलू | ४२ (८.२५) | ११ (२.१६) | ०३ (०.५८) | ०२ (०.३९) | ०० (००) | ०० (००) | ०० (००) |
| मानवत | ३३ (६.४८) | ०९ (१.७६) | ०५ (०.९८) | ०१ (०.१९) | ०० (००) | ०० (००) | ०० (००) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पालम | ३९ (७.६६) | १२ (२.३५) | ०३ (०.५८) | ०२ (०.३९) | ०० (००) | ०० (००) | ०० (००) |
| पूर्णा | ४५ (८.८४) | ०७ (१.३७) | ०५ (०.९८) | ०१ (०.१९) | ०० (००) | ०० (००) | ०१ (०.१९) |
| गंगाखेड | ३८ (७.४६) | १३ (२.५५) | ०७ (१.३७) | ०० (००) | ०१ (०.१९) | ०१ (०.१९) | ०० (००) |
| सोनपेठ | ४३ (८.४४) | ०८ (१.५७) | ०४ (०.७८) | ०१ (०.१९) | ०० (००) | ०० (००) | ०० (००) |
| पाथरी | ४० (७.८५) | १० (१.९६) | ०३ (०.५८) | ०१ (०.१९) | ०१ (०.१९) | ०० (००) | ०० (००) |
| परभणी | ४२ (८.२५) | ०९ (१.७६) | ०४ (०.७८) | ०० (००) | ०० (००) | ०१ (०.१९) | ०० (००) |
| एकूण | ३६१ (७०.९२) | ९२ (१८.०७) | ३८ (७.४६) | ११ (२.१६) | ०३ (०.५७) | ०२ (०.३८) | ०२ (०.३८) |

**स्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.३ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची शैक्षणिक स्थिती दर्शविलेली आहे. जिल्ह्यातील एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी स्त्रियांची एकूण लोकसंख्या ५०९ आहे. त्यापैकी निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या ३६१ (७०.९२ टक्के) एवढी असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या ४५ (८.८४ टक्के) असून ती पूर्णा तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी निरक्षर असलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या ३३ (६.४८ टक्के) असून ती मानवत तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ९२ (१८.०७ टक्के) स्त्रियांनी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या प्रत्येकी १३ (२.५५ टक्के) असून ती जिंतूर आणि गंगाखेड तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात

कमी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या ०७ (१.३७ टक्के) पूर्णा तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ३८ (७.४१ टक्के) स्त्रियांनी माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या ०७ (१.३७ टक्के) असून ती गंगाखेड तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या प्रत्येकी ०३ (०.५८ टक्के) असून ती सेलू, पालम आणि परभणी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ११ (२.१२ टक्के) स्त्रियांनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या ०३ (०.५८ टक्के) असून ती जिंतूर तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या प्रत्येकी ०१ (०.३८ टक्के) असून ते मानवत, पूर्णा, सोनपेठ आणि पाथरी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ११ (२.१२ टक्के) स्त्रियांनी पदवीधर शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त पदवीधर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबांतील स्त्रियांची संख्या प्रत्येकी ०१ (०.१९ टक्के) असून ती जिंतूर, गंगाखेड आणि पाथरी तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी पदवी शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या प्रत्येकी ०० (०० टक्के) असून ती सेलू, मानवत, पालम, पूर्णा, सोनपेठ आणि परभणी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ०२ (०.३८ टक्के) स्त्रियांनी पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त पदव्युत्तर

शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या प्रत्येकी ०१ (०.१९ टक्के) असून ती गंगाखेड आणि परभणी तालुक्यातून आली आहे. तर सर्वात कमी पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या प्रत्येकी ०० (शून्य) असून ती जिंतूर, सेलू, मानवत, पालम, पूर्णा, सोनपेठ आणि पाथरी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ०२ (०.३८ टक्के) स्त्रियांची व्यावसायिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या प्रत्येकी ०१ (०.१९ टक्के) असून ती जिंतूर आणि पूर्णा तालुक्यातून आढळून आली आहे तर सर्वात कमी व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांची संख्या ०० (शून्य) असून ती सेलू, मानवत, पालम, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी आणि परभणी तालुक्यातून आढळून आली आहे.

थोडक्यात यावरुन असे आढळून येते की, आदिवासी समाजातील महिलांची शैक्षणिक गळतीचे प्रमाण अधिक आहे. आदिवासी समाजातील स्त्रियांचे शिक्षणामधील प्रमाण कमी असण्याचे कारण म्हणजे बहुतांशी आदिवासी समाज गावोगावी विखूरलेल्या स्वरूपात राहतो. शेतमजूरी करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. उदरनिर्वाह करण्यासाठी आर्थिक उत्पन्नाचे साधने मर्यादित स्वरूपाचे असल्याने बहुतांशी महिला शेतमजूरी करताना दिसतात. आई-वडिलांचे अज्ञान, महिलाकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोन, चुल आणि मुल, मुलगी म्हणजे परक्याचे धन या भावने पोटी आदिवासी समाजातील महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. समाज विकासात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे आदिवासी समाजात महिलांची शैक्षणिक उन्नती होणे गरजेचे असते. परंतु आदिवासी समाजात महिलांना अशी प्रेरणा कमी

प्रमाणात मिळते त्यामुळे आदिवासी समाजामध्ये महिलांच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण जास्त असून स्त्री शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

### ४.३.३ आदिवासी कुटुंबातील मुलांची शैक्षणिक स्थिती :

देशाचा विकास आणि भवितव्य हा नवयुवक पिढीच्या शिक्षणावर अवलंबून आहे. ज्या समाजातील मुले अधिक शिक्षण घेतलेले असतील त्या समाजाचा विकास आणि प्रगती अधिक झालेली आहे. या दृष्टीकोनातून परभणी जिल्ह्यातील ३६० नमुना आदिवासी कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला असता, असे दिसून आले की, अद्यापही आदिवासी समाजातील मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे आढळून येतात. ते खालील तक्त्यामध्ये अधिक स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.४**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांतील मुलांची शैक्षणिक स्थिती**

| तालुका | शैक्षणिक स्तर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | पदव्युत्तर | व्यावसायिक | अभियांत्रिकी |
| जिंतूर | ११ (१.२८) | ४१ (४.७७) | २८ (३.२५) | ११ (१.२८) | ०६ (०.७०) | ०३ (०.३४) | ०३ (०.३४) | ०१ (०.११) |
| सेलू | ०६ (०.७०) | ३९ (४.५२) | ३० (३.४९) | १७ (१.९८) | ०७ (०.८१) | ०२ (०.२३) | ०१ (०.११) | ०० (००) |
| मानवत | ०४ (०.४६) | ३३ (३.८३) | २२ (२.५५) | ०८ (०.९२) | ०८ (०.९२) | ०३ (०.३४) | ०२ (०.२३) | ०० (००) |
| पालम | १० (१.१६) | ३६ (४.१८) | २७ (३.१३) | १५ (१.७४) | ०६ (०.७०) | ०४ (०.४६) | ०४ (०.४६) | ० (१.११) |
| पूर्णा | ०५ (०.५९) | ४२ (४.८८) | २६ (३.०१) | ०९ (१.०४) | ११ (१.२८) | ०३ (०.३४) | ०२ (०.२३) | ०० (००) |
| गंगाखेड | ०७ (०.८१) | ३२ (३.७१) | ३२ (३.७१) | १३ (१.५०) | ०५ (०.५९) | ०४ (०.४६) | ०२ (०.२३) | ०० (००) |
| सोनपेठ | ०५ (०.५९) | ४३ (५.००) | २१ (२.४३) | १४ (१.६२) | ०९ (०.०४) | ०५ (०.५९) | ०२ (०.२३) | ०० (००) |
| पाथरी | ०६ | ३० | २२ | १२ | ०८ | ०४ | ०१ | ०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (०.७०) | (३.४९) | (२.५५) | (१.४०) | (०.९२) | (०.४६) | (०.११) | (००) |
| परभणी | ०८<br>(०.९२) | २८<br>(३.२५) | २९<br>(३.३६) | १६<br>(१.८५) | ०७<br>(०.८१) | ०३<br>(०.३४) | ०५<br>(०.५९) | ०१<br>(०.११) |
| एकूण | ६२<br>(७.२०) | ३२४<br>(३७.६३) | २३७<br>(२७.५२) | ११५<br>(१३.८५) | ६७<br>(७.७९) | ३१<br>(३.६०) | २२<br>(२.५५) | ०३<br>(०.३४) |

**स्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.४ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील मुलांची शैक्षणिक स्थिती दर्शविलेली आहे. जिल्ह्यातील एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी मुलांची एकूण लोकसंख्या ८६१ आहे. त्यापैकी निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ६२ (७.२० टक्के) एवढी असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ११ (१.२८ टक्के) असून ती जिंतूर तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ०४ (०.४६ टक्के) असून ती मानवत तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ३२४ (३७.६३ टक्के) मुलांनी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ४३ (५.०० टक्के) असून ती सोनपेठ तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या २८ (३.२५ टक्के) असून ती परभणी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील २३७ (२७.५२ टक्के) मुलांनी माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ३२ (३.७१ टक्के)

असून ती गंगाखेड तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांच्या सदस्यांची संख्या प्रत्येकी २२ (२.५५ टक्के) असून ती मानवत आणि पाथरी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ११५ (१३.३५ टक्के) मुलांनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या १७ (१.९८ टक्के) असून ती सेलू तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ०८ (०.९२ टक्के) असून ती मानवत तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ६७ (७.७९ टक्के) मुलांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतलेले आहे. तालुका निहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ११ (१.२८ टक्के) असून ती पूर्णा तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी पदवी शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ०५ (०.५९ टक्के) असून ती सोनपेठ तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ३१ (३.६० टक्के) मुलांनी पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ०५ (०.५९ टक्के) असून ती सोनपेठ तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ०२ (०.२३) असून ती सेलू तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यात नमुना आदिवासी कुटुंबातील २२ (२.५५ टक्के) मुलांनी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त व्यावसायिक

शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या ०५ (०.५९ टक्के) असून ती परभणी तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या प्रत्येकी ०१ (०.११टक्के) असून ती सेलू आणि पाथरी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ०३ (०.३४ टक्के) मुलांनी अभियांत्रिकी शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या प्रत्येकी ०१ (०.११ टक्के) असून ते जिंतूर, पूर्णा आणि परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांची संख्या शून्य (००) असून ते सेलू, मानवत, पालम, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी तालुक्यातून आढळून आली आहे.

थोडक्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या आदिवासी कुटुंबातील मुलांचे प्रमाण खूपच कमी असल्याचे दिसून येते. त्याचे कारण म्हणजे आदिवासी समाज जंगलात आणि दऱ्या खोऱ्यात व दुर्गम भागात राहत असल्यामुळे त्यांच्या इतर सुधारित समाजाशी तुरळक प्रमाणात संबंध येतो. आदिवासींच्या मुलापर्यंत शिक्षणाचे वारे पोहचलेले दिसून येत नाही. मुलांच्या शिक्षणाकडे पाहिजे तेवढ्या प्रमाणात काळजीपूर्वक लक्ष दिले जात नाही. बहुसंख्य आदिवासी समाज पारंपरिक शेती आणि मजुरी करत असल्यामुळे मुलांना शाळेत पाठविण्या ऐवजी ते मजुरीकरिता पाठविले जाते. जी मुले शिक्षण घेतात त्यांना सुध्दा शेतीची कामे, मजुरी अधूनमधून करावी लागतात. जास्त शिक्षण घेऊन सर्वांनाच नोकरी लागणार नाही. या भावनेने आदिवासी समाजातील मुलांच्या शिक्षणाचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे आढळून आले.

### ४.३.४ आदिवासी कुटुंबातील मुलींची शैक्षणिक स्थितीः

शिक्षण हे विकासाचे मुलमंत्र आहे. मुलींच्या शिक्षणामुळे सर्व कुटुंबाचा विकास होतो. म्हणून आदिवासी भागातील मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी शासनाद्वारे विविध योजना राबविल्या जातात. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील आदिवासी मुलींच्या शिक्षणामध्ये वाढ होताना दिसून येते. परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील मुलींच्या शैक्षणिक स्थितीचे शैक्षणिक स्तरानुसार वर्गीकरण खालील तक्त्यामध्ये केले आहे.

**तक्ता क्र. ४.५**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांतील मुलींची शैक्षणिक स्थिती**

| तालुका | शैक्षणिक स्तर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | पदव्युत्तर | व्यावसायिक | अभियांत्रिकी |
| जिंतूर | १३ (१.५१) | ४८ (५.६०) | २२ (२.५८) | ०८ (०.९३) | ०६ (०.७०) | ०१ (०.११) | ०२ (०.२३) | ०० (००) |
| सेलू | ०९ (१.०५) | ५४ (६.३०) | २६ (३.०३) | १० (१.१६) | ०३ (०.३५) | ०० (००) | ०० (००) | ०० (००) |
| मानवत | १० (१.१६) | ५१ (५.९५) | २१ (२.४५) | ०६ (०.७०) | ०२ (०.२३) | ०० (००) | ०१ (०.११) | ०० (००) |
| पालम | ११ (१.२८) | ४१ (४.७९) | १८ (२.१०) | ०५ (०.५९) | ०२ (०.२३) | ०० (००) | ०० (००) | ०० (००) |
| पूर्णा | ०७ (०.८१) | ६८ (७.९४) | २३ (२.६९) | ११ (१.२९) | ०४ (०.४६) | ०० (००) | ०१ (०.११) | ०० (००) |
| गंगाखेड | ०९ (१.०५) | ५० (५.८४) | १६ (१.८६) | ०४ (०.४६) | ०२ (०.२३) | ०१ (०.११) | ०१ (०.११) | ०० (००) |
| सोनपेठ | १४ (१.६३) | ४९ (५.७२) | २४ (२.८०) | १३ (१.५१) | ०१ (०.११) | ०० (००) | ०१ (०.११) | ०० (००) |
| पाथरी | १२ (१.४०) | ५३ (६.२०) | १८ (२.१०) | ०७ (०.८१) | ०३ (०.३५) | ०० (०.००) | ०१ (०.११) | ०० (००) |
| परभणी | १९ (२.२१) | ४२ (४.९०) | १७ (१.९९) | ०८ (०.९३) | ०५ (०.५८) | ०१ (०.११) | ०१ (०.११) | ०० (००) |
| एकूण | १०४ (१२.१४) | ४५६ (५३.२८) | १८५ (२१.६१) | ७२ (८.४१) | २८ (३.२८) | ०३ (०.३५) | ०८ (०.९३) | ०० (००) |

**स्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.५ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील मुलींची शैक्षणिक स्थिती दर्शविलेली आहे. जिल्ह्यातील एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी मुलींची एकूण लोकसंख्या ८५६ आहे. त्यापैकी निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या १०४ (१२.१४ टक्के) एवढी असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या १९ (२.२१ टक्के) असून ती परभणी तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी निरक्षर असणाऱ्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ०७ (०.८१ टक्के) असून ती पूर्णा तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ४५६ (५३.२८ टक्के) मुलींनी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ५४ (६.३० टक्के) असून ती सेलू तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ४१ (४.७९ टक्के) असून ती पालम तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील १८५ (२१.६१ टक्के) मुलींनी माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या २६ (३.०३ टक्के) असून ती सेलू तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या १६ (१.८६ टक्के) असून ती गंगाखेड तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ७२ (८.४१ टक्के) मुलींनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या १३ (१.५१ टक्के)

असून ती सोनपेठ तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ५ (०.५९ टक्के) असून ती पालम तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील २८ (३.२८ टक्के) मुलींनी पदवी शिक्षण घेतलेले आहे. तालुका निहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त पदवी शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ०६(०.७० टक्के) असून ती जिंतूर तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी पदवधीर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ०१ (०.११ टक्के) असून ती सोनपेठ तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील ०३ (०.३५ टक्के) मुलींनी पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या प्रत्येकी ०१ (०.११ टक्के) असून ती जिंतूर, गंगाखेड आणि परभणी तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ०० (००) असून ती सेलू, मानवत, पालम, पूर्णा, सोनपेठ आणि पाथरी तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यात नमुना आदिवासी कुटुंबातील ०८ (०.९३ टक्के) मुलींनी व्यावसायिक शिक्षण घेतलेले आहे तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वात जास्त व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ०२ (०.२३ टक्के) असून ती जिंतूर तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी व्यावसाायिक शिक्षण घेतलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींची संख्या ०० शून्य असून ती सेलू आणि पालम तालुक्यातून आढळून आली आहे.

अभियांत्रिक शिक्षण एकाही मुलींनी घेतलेले नाहीत.

थोडक्यात परभणी जिल्ह्यात नमुना आदिवासी कुटुंबात उच्च शिक्षित असलेल्या मुलींची संख्या कमी दिसून आली आहे. त्यांचे महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण भागात असलेल्या शैक्षणिक सोयी सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध असणे, लहानपणीच लग्न करणे, आईला घर कामात मदत करणे, मुलगी ही परक्याचे धन म्हणून समजणे या अनेक कारणामुळे मुलींच्या शिक्षणाचे व गळतीचे प्रमाण आदिवासी समाजात अधिक असल्याचे दिसून आले आहे.

### ४.३.४ आदिवासी समाजाच्या साक्षरतेची राज्य व जिल्हा साक्षरतेशी तुलना :

परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबांची राज्य व जिल्ह्यातील शैक्षणिक स्थितीची तुलना केली असता असे निदर्शनास आले की, नमुना म्हणून निवड केलेल्या आदिवासी समाजाच्या साक्षरतेचे प्रमाण हे राज्याच्या साक्षरता व जिल्ह्याच्या साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा (स्त्री/पुरुष) कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. हे खालील तक्ता  मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ४.६**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाच्या साक्षरतेची राज्य व जिल्हा साक्षरतेशी तुलना**

| तपशील | महाराष्ट्र राज्य (जनगणना २०११) | परभणी जिल्हा (जनगणना २०११) | नमुना आदिवासी कुटुंब |
|---|---|---|---|
| पुरुष | ८९.८२ | ८०.५८ | ४८.४६ |
| स्त्रिया | ७५.७८ | ५२.९८ | २९.०७ |
| एकूण | ८२,९१ | ६६.६८ | ३८.७६ |

**स्त्रोत :** १) प्रत्यक्ष नमुना पाहणी
२) परभणी जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन २०१३
३) दृष्टीक्षेप औरंगाबाद विभाग, २०१३

तक्ता क्रमांक ४.६ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या साक्षरतेची राज्य व जिल्हा साक्षरतेशी तुलना केलेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र

राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२.९१ टक्के असून त्यामध्ये स्त्री साक्षरता ७५.७८ टक्के आणि पुरुष साक्षरता प्रमाण ८९.८२ टक्के एवढे आहे. परभणी जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ६६.६८ टक्के एवढे आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता प्रमाण ८०.५८ टक्के एवढे आहे. आणि स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५२.९८ टक्के एवढे आहे. २०१४ -१५ या वर्षातील परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबातील एकूण साक्षरता प्रमाण ३८.७६ टक्के एवढे आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता प्रमाण ४८.४६ टक्के आणि स्त्रिया साक्षरता प्रमाण २९.०७ टक्के एवढे आहे.

थोडक्यात परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाज हा साक्षरतेच्या बाबतीत राज्य व जिल्हा साक्षरता यांच्या तुलनेत मागे आहे.

### ४.३.५ परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाच्या निरक्षरतेची राज्य व जिल्हा निरक्षरतेशी तुलना :

महाराष्ट्र राज्य, परभणी जिल्हा आणि आदिवासी समाजाच्या ३६० कुटुंबातील निरक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्य व परभणी जिल्ह्याच्या तुलनेने निरक्षरतेच्या आदिवासी समाजातील (स्त्री/पुरुष) निरक्षरता अधिक प्रमाणात आहे. हे खालील तक्ता मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ४.७**

**परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील निरक्षरतेची राज्य व जिल्हा साक्षरतेची तुलना**

| तपशील | महाराष्ट्र राज्य जनगणना २०११ | परभणी जिल्हा २०११ | आदिवासी समाज टक्केवारी |
|---|---|---|---|
| पुरुष | १०.२८ | १९.४२ | ५१.५३ |
| स्त्रिया | २४.५२ | ४७.०२ | ७०.९२ |
| एकूण | १७.०९ | ३३.२२ | ६१.२२ |

**स्त्रोत :**

**१.** प्रत्यक्ष नमुना पाहणी

२. परभणी जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन २०१३

३. दृष्टीक्षेप औरंगाबाद विभाग २०१३

तक्ता क्र. ४.७ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील निरक्षरतेची राज्य व जिल्हा साक्षरतेशी तुलना केलेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील निरक्षरतेची टक्केवारी १७.०४ टक्के एवढी असून त्यामध्ये पुरूष निरक्षरतेचे प्रमाण १०.२८ टक्के आणि स्त्री निरक्षरतेचे प्रमाण २४.५२ टक्के आहे. २०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यातील निरक्षरतेची टक्केवारी ३३.२२ टक्के एवढी असून त्यापैकी पुरूष निरक्षरतेची टक्केवारी १९.४२ टक्के आणि स्त्री निरक्षरतेची टक्केवारी ४७.०२ टक्के एवढी आहे. परभणी जिल्ह्यातील नमुना ३६० आदिवासी कुटुंबाची २०१४-२०१५ च्या काळातील आदिवासी समाजाची निरक्षरतेची टक्केवारी ६१.२२ टक्के एवढी असून त्यापैकी पुरूषांच्या निरक्षरतेची टक्केवारी ५१.५३ टक्के आणि स्त्रियांच्या निरक्षरतेची टक्केवारी ३०.७० टक्के एवढी आहे.

थोडक्यात राज्यातील एकूण निरक्षरतेची टक्केवारी १७.०७ टक्के, परभणी जिल्ह्यातील एकूण निरक्षरतेची टक्केवारी ३३.२२ टक्के आणि परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील एकूण निरक्षरतेची टक्केवारी ६१.२२ टक्के एवढी आहे. म्हणजेच राज्य व जिल्ह्याच्या आदिवासी कुटुंबातील निरक्षरतेची टक्केवारी अधिक आहे. ही एक गंभीर समस्या या समाजात निर्माण झाली आहे.

### ४.४.१ आदिवासी गावातील आरोग्य विषयक स्थिती :

शरीर निरोगी असेल तर मन सुध्दा निरोगी राहू शकते. मानवाचे शरीर निरोगी असणे  हे अत्यंत महत्त्वाचे आहे. आदिवासी समाजाला अनेक शारीरिक व मानसिक आजाराशी सामना करावा लागतो. विकासासाठी अधिक महत्त्वाच्या घटक असलेल्या वैद्यकीय सुविधा व सार्वजनिक आरोग्य सेवा यात लक्षणीय सुधारणा झालेल्या आहे. परंतु अजूनही ग्रामीण भागात आरोग्य विषयक सुविधा अपुऱ्या दिसून येतात. परभणी जिल्ह्यातील निवडक आदिवासी गावातील आरोग्य विषयक सुविधांची स्थिती खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र ४.८**

**परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी गावातील आरोग्या संबंधी माहिती दर्शविणारा तक्ता.**

| तालुका | प्रा.आ.केंद्रांची सुविधा असणाऱ्या गावाची संख्या | प्रा.आ.केंद्र सुविधा नसणाऱ्या गावाची संख्या | एकूण गावाची संख्या |
|---|---|---|---|
| जिंतूर | ०१ (२.७७) | ०३ (८.३३) | ०४ (११.११) |
| सेलू | ०० (००.००) | ०४ (११.११) | ०४ (११.११) |
| मानवत | ०० (००.००) | ०४ (११.११) | ०४ (११.११) |
| पालम | ०० (००.००) | ०४ (११.११) | ०४ (११.११) |
| पूर्णा | ०१ (२.७७) | ०३ (८.३३) | ०४ (११.११) |
| गंगाखेड | ०० (००.००) | ०४ (११.११) | ०४ (११.११) |
| सोनपेठ | ०० (००.००) | ०४ (११.११) | ०४ (११.११) |
| पाथरी | ०० (००.००) | ०४ (११.११) | ०४ (११.११) |
| परभणी | ०१ (२.७७) | ०३ (८.३३) | ०४ (११.११) |
| एकूण | ०३ (८.३३) | ३३ (९१.६६) | ३६ (१००.००) |

**स्त्रोत : प्रत्यक्ष नमुना पाहणी**

**टीप :** कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.८ वरुन असे दिसून येते की, नमुना म्हणून निवडलेल्या ३६ आदिवासी गावापैकी केवळ ०३ गावात प्राथमिक आरोग्य असल्याचे आढळून आले असून त्याची टक्केवारी ८.३३ टक्के एवढी आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा नसणाऱ्या गावांची संख्या ३३ असून त्याची टक्केवारी ९१.६६ टक्के एवढी आहे. परभणी जिल्ह्यातील नमुना गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा असणाऱ्या गावाचा तालुकानिहाय वर्गीकरण केले असता जिंतूर, पूर्णा आणि परभणी तालुक्यातून प्रत्येकी एक प्राथमिक आरोग्य केंद्र आढळून आले आहे. तर सेलू, मानवत, पालम,

गंगाखेड आणि सोनपेठ या तालुक्यातील निवडक गावात प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा आढळून आली नाही.

थोडक्यात आदिवासी गावात अजूनही आरोग्यविषयक सुविधा नसल्याचे दिसून येते. ज्या गावात आरोग्य सेवा आहेत ते मोठ्या गावामध्ये समाविष्ठ आहेत.

**४.४.२ प्रसूती गृहाची सोय :**

आदिवासी समाजातील महिलांची प्रसूतीची सोय शक्यतो दवाखान्यात होणे गरजेचे असते. कारण आदिवासी समाजातील मुलींचा विवाह कमी वयात होत असून त्यांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागते. तसेच घरी जर प्रसूती झाली तर दाई यांनी प्रशिक्षण घेतलेले नसते. तसेच ती बाळाची आणि त्यांच्या आईची योग्य प्रकारे काळजी घेत नाही. त्यामुळे माता आणि जन्मणाऱ्या अपत्याला विविध रोगाचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे महिलांच्या प्रसूतीची सोय दवाखान्यात झाली पाहिजे.

**तक्ता क्र.४.९**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील महिलांच्या प्रसूती गृहाची स्थिती दर्शविणारा तक्ता.**

| तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्रात | घरी | एकूण आदिवासी कुटुंबे |
|---|---|---|---|
| जिंतूर | २६ (७.२२) | १४ (३.८८) | ४० (११.११) |
| सेलू | ३२ (८.८८) | ०८ (२.२२) | ४० (११.११) |
| मानवत | २८ (७.७७) | १२ (३.३३) | ४० (११.११) |
| पालम | ३० (८.३३) | १० (२.७७) | ४० (११.११) |
| पूर्णा | २५ (६.९४) | १५ (४.१६) | ४० (११.११) |
| गंगाखेड | ३१ (८.६१) | ०९ (२.५) | ४० (११.११) |
| सोनपेठ | २७ (७.५) | १३ (३.६१) | ४० (११.११) |
| पाथरी | २६ (७.२२) | १४ (३.८८) | ४० (११.११) |
| परभणी | २९ (८.०५) | ११ (३.०५) | ४० (११.११) |
| एकूण | २५४ (७०.५६) | १०६ (२९.४४) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.९ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील महिलांच्या प्रसूतीच्या ठिकाणीची माहिती दिलेली आहे. त्यानुसार एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी २५४ (७०.५६) कुटुंबातील महिलांची प्रसूती ही दवाखान्यात झालेली आहे. आणि १०६ (२९.४४ टक्के) कुटुंबातील महिलांची प्रसूती दाईच्या मार्गदर्शनाखाली घरीच झालेली आहे. जिल्ह्यातील आदिवासी आदिवासी कुटुंबातील महिलांच्या प्रसूतीविषयी तालूकानिहाय वर्गीकरण केले असता दवाखान्यात प्रसूती होणारे सर्वात जास्त ३२ (८.८८ टक्के) कुटुंब हे सेलू तालुक्यातून आढळून आले. तर दवाखान्यात सर्वात कमी प्रसूती होणारे २५ (६.४४ टक्के) कुटुंब हे पूर्णा तालुक्यातून आढळून आले आहे. तसेच घरी प्रसूती झालेल्या १०६ (२९.४६ टक्के) एकूण आदिवासी कुटुंबापैकी सर्वात जास्त १५ (४.१६ टक्के) कुटुंब हे पूर्णा तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी प्रसूती झालेली ०८ (२.२२) कुटुंब हे सेलू तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात महिलांची प्रसूती सोय घरीच केली जात असल्याने जन्माला येणाऱ्या बाळाला संसर्गजन्य होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महिलांची प्रसूती घरी होण्याचे कारण म्हणजे गरीबी, आधुनिक वैद्यकीय सोयी सुविधा विषयीचे अज्ञान आहे म्हणून आदिवासी कुटुंबातील महिलांची प्रसूती ही घरीच होते.

**आरोग्य विषयक स्थिती :**

आदिवासी समाज हा इतर समाजापासून अलिप्त आणि डोंगराच्या पायथ्याजवळ राहणारा समाज आहे. या समाजाच्या वस्तीमध्ये अजूनही वैद्यकीय सोयी सुविधाचा प्रसार प्रचार कमी प्रमाणात झालेला आहे म्हणून या समाजातील लोक विविध रोगांवर अजूनही निसर्गातील जडीबूटीचा आधार घेतात.

**उपचार पद्धती :**

आदिवासी गावात आरोग्य विषयक सेवा पुरविणाऱ्या उत्तम प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या कमी प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील बहुतांश आदिवासी समाजातील

लोक अंधश्रध्देवर विश्वास ठेवतात. त्यामुळे रोगावर प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन उपचार करुन घेत नाही. तसेच आदिवासी लोकांचे उत्पन्न कमी असल्याने त्यांना महागड्या व खाजगी दवाखान्यातील सेवा किंवा औषधे घेणे परवडत नाही. त्यामुळे ते दवाखान्या ऐवजी पर्यायी मार्गाचा अवलंब करतात. परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील लोक विविध रोगावर कोणत्या ठिकाणी उपचार करतात. या विषयी माहिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ४.१०**
**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील उपचार पध्दती संबंधीत माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | घरगुती उपचार | मांत्रिक उपचार | एकूण आदिवासी कुटुंब |
|---|---|---|---|---|
| जिंतूर | २८ (७.७७) | ७ (१.९४) | ५ (१.३८) | ४० (११.११) |
| सेलू | २५ (६.९४) | ८ (२.२२) | ७ (१.९४) | ४० (११.११) |
| मानवत | २२ (६.११) | १२ (३.३३) | ६ (१.६६) | ४० (११.११) |
| पालम | २७ (७.५) | ५ (१.३८) | ८ (२.२२) | ४० (११.११) |
| पूर्णा | २४ (६.६६) | १० (२.७७) | ६ (१.६६) | ४० (११.११) |
| गंगाखेड | २९ (८.०५) | ७ (१.९४) | ४ (१.११) | ४० (११.११) |
| सोनपेठ | २५ (६.९४) | ९ (२.५) | ६ (१.६६) | ४० (११.११) |
| पाथरी | २३ (६.३८) | ७ (१.९४) | १० (२.७७) | ४० (११.११) |
| परभणी | ३० (८.३३) | ६ (१.६६) | ४ (१.११) | ४० (११.११) |
| एकूण | २३३ (६४.७२) | ७१ (१९.७२) | ५६ (१५.५६) | ३६० (१००.००) |

**स्त्रोतः** प्रत्यक्ष नमुना पाहणी
**टीप :** कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१० मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील उपचार पध्दती विषयी माहिती दर्शविलेली आहे. नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबांपैकी २३३ आदिवासी कुटुंब हे दवाखान्यात उपचार घेत असून त्याची टक्केवारी ६४.७२ टक्के एवढी आहे. तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक दवाखान्यात उपचार घेणारे २९ (८.०५) आदिवासी कुटुंब हे गंगाखेड तालुक्यातून आढळून आले. तर सर्वात कमी दवाखान्यात उपचार घेणारे २३ (६.३८) आदिवासी कुटुंब हे पाथरी तालुक्यातून दिसून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी ७१ कुटुंब हे घरगुती उपचार पध्दतीचा वापर करत असून त्याची टक्केवारी १९.७२ टक्के एवढी आहे. तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक घरगुती उपचार घेणारे १२ (३.३३) कुटुंब हे मानवत तालुक्यात आढळून आले आहे. तर सर्वात कमी घरगुती उपचार पध्दतीचा वापर करणारे ५ (१.३८) कुटुंब हे पालम तालुक्यात आढळून आले आहे.

जिल्ह्यातील आदिवासी गावातील नमुना म्हणून निवडलेल्या मांत्रिक उपचारासंबंधित माहिती घेतली असता ५६ कुटुंबांनी मांत्रिकाकडून उपचार करुन घेतल्याचे दिसून आले असून त्याची टक्केवारी १५.५६ टक्के एवढी आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक मंत्रिकाचे उपचार घेणारे १० (२.७७ टक्के) आदिवासी कुटुंब हे पाथरी तालुक्यातून आढळूल आले आहे. तर सर्वात कमी मंत्रिकाचे उपचार घेणारे ४ (१.११ टक्के) आदिवासी कुटुंब हे परभणी आणि गंगाखेड तालुक्यातून आढळून आले आहे.

वरील आकडेवारी वरुन लक्षात येते की, दवाखान्याचा लाभ घेणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या २३३ (६४.७२ टक्के) एवढी आहे. घरगुती व मंत्रिकाचा उपचार घेणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या १२७ (३५.२८ टक्के) एवढी आहे. यावरुन असे दिसून येते की, पारंपरिक उपचार पध्दतीचा वापर आदिवासी समाजात दिसून येतो.

थोडक्यात आदिवासी समाजात दवाखान्याऐवजी घरगुती उपचार करून घेण्याचे कारण म्हणजे घरगुती उपचार पद्धतीवर असणारा विश्वास, आर्थिक स्थिती, प्राथमिक आरोग्य केंद्राचे अंतर आणि दवाखान्याविषयी असणारा दूषित दृष्टिकोन हा आहे. परिणामतः गावातील खाजगी उपचार पद्धतीचा अवलंब आदिवासी कुटुंबातील लोक करत असल्याचे आढळून आले आहे.

**४.४.३ व्यसनधिनता :**

आजच्या काळात व्यसनधिनता ही एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. व्यसन ही एक शारीरिक सवय असून ते एक वैगुण्य आहे. आदिवासी समाजात पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना ही व्यसनाची सवय लागलेली आहे. या सवयीमुळे अनेकांना आजार निर्माण होतात. दारू, विडी, ताडी, तंबाखू, गुटखा, तपकीरने दात घासणे या सवयी आदिवासी समाजामध्ये प्रकर्षाने दिसून येतात. आदिवासी समाजात कुटुंबांतील सदस्यांना कोणत्या ना कोणत्या व्यसनाची सवय झालेली आहे. धार्मिक व सामाजिक विधीत दारूना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील लोकांचा व्यसनावर होणारा खर्च वाढत आहे. परिणाम स्वरूप त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**तक्ता क्र ४.११**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील व्यसनाधिता संबंधित माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | तंबाखू | विडी /चिलाम | दारू | समिश्र | गुटखा | एकूण आदिवासी कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|---|
| जिंतूर | १० (३.०७) | १२ (३.७०) | ०४ (१.२३) | ०७ (२.१५) | ०२ (०.६१) | ३५ (१०.७६) |
| सेलू | १२ (३.६९) | ०९ (२.७७) | ०६ (१.५३) | ०५ (१.५३) | ०४ (१.२३) | ३६ (११.०७) |
| मानवत | ०८ (२.४७) | ११ (३.३८) | ०५ (१.५३) | ०६ (१.८४) | ०७ (२.१५) | ३७ (११.३८) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पालम | १० (३.०७) | १२ (३.७०) | ०३ (०.९२) | ०५ (१.५३) | ०४ (१.२३) | ३४ (१०.४६) |
| पूर्णा | १३ (४.००) | १० (३.७०) | ०४ (१.२३) | ०७ (२.१५) | ०४ (१.२३) | ३८ (११.७०) |
| गंगाखेड | ०९ (२.७६) | १० (३.७०) | ०६ (१.८४) | ०५ (१.५३) | ०५ (१.५३) | ३५ (१०.७६) |
| सोनपेठ | १० (३.०७) | ११ (३.३८) | ०३ (०.९२) | ०६ (१.८४) | ०४ (१.२३) | ३४ (१०.४६) |
| पाथरी | ११ (३.३८) | ०८ (२.४७) | ०५ (१.५३) | ०७ (२.१५) | ०६ (१.८४) | ३७ (११.३८) |
| परभणी | १२ (३.७०) | ११ (३.३८) | ०६ (१.८४) | ०६ (१.८४) | ०४ (१.२३) | ३९ (१२.००) |
| एकूण | ९५ (२९.२३) | ९४ (२८.९२) | ४२ (१२.९२) | ५४ (१६.६१) | ४० (१२.३०) | ३२५ (१००.००) |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र ४.११ वरून असे दिसून येते की, परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी ३२५ आदिवासी कुटुंब कोणत्या ना कोणत्या तरी व्यसनाने ग्रासलेले आहेत. त्यापैकी सर्वाधिक ९५ आदिवासी कुटुंब हे तंबाखू या व्यसनाने ग्रासलेले असून त्याची टक्केवारी २९.३३ टक्के एवढी आहे. विडी व चिलीम या व्यसनाची ९४ आदिवासी कुटुंबांना सवय लागलेली असून त्याची टक्केवारी २८.९२ टक्के एवढी आहे. आणि दारू या व्यसनाने ४२ आदिवासी कुटुंबांना सवय झाली असून त्याची टक्केवारी १२.९२ टक्के एवढी आहे. तर सर्वात कमी ४० (१२.३६टक्के) आदिवासी कुटुंबाना गुटख्याची सवय जडलेली आहे.

परभणी जिल्ह्यातील व्यसनाची सवय असलेल्या ३२५ आदिवासी कुटुंबापैकी तंबाखूचे व्यसन असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या ९५ (२९.३३टक्के) असून त्याचा तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक तंबाखूची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या १२ (३.६९ टक्के) असून ते सेलू आणि परभणी

तालुक्यातून दिसून आले आहे. तर सर्वात कमी तंबाखूची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या ०८ (२.४७ टक्के) असून ते मानवत तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी विडी, चिलीम ची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ९४ (२८.९२ टक्के) असून तालुका निहाय अभ्यास केला असता सर्वाधिक विडी व चिलीमची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या १२ (३.७० टक्के) असून ते पालम तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी व्यसन असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०८ (२.४७ टक्के) असून ते पाथरी तालुक्यातून दिसून आले आहे. चिलीमच्या पावडरचा वापर दात घासण्यासाठी सुद्धा केला जातो.

परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडण्यात आलेल्या आदिवासी कुटुंबापैकी दारूची व्यसन असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ४२ (१२.९२ टक्के) असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक दारूची व्यसन असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या प्रत्येकी ०६ (१.५३ टक्के) असून ते सेलू, गंगाखेड, परभणी या तालुक्यात दिसून आले आहे. तर सर्वात कमी दारूची व्यसन असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०३ (०.९२ टक्के) असून ते सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांपैकी एकूण ५४ कुटुंबांना समिश्र व्यसनांची सवय जडलेली असून त्याची टक्केवारी १६.६१ टक्के एवढी आहे. समिश्र व्यसनाची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबांचा तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक समिश्र व्यसनाची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या प्रत्येकी ०७ (२.१५ टक्के) असून ते जिंतूर, पूर्णा, पाथरी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी समिश्र व्यसन असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या प्रत्येकी ५ (१.५३ टक्के) हे सेलू, पालम, गंगाखेड तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी गुटख्याची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ४० (१२.३० टक्के) असून तालुकानिहाय

अभ्यास केला असता सर्वाधिक गुटख्याची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०७ (२.१५ टक्के) असून ते मानवत तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी गुटख्यांची सवय असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०२ (०.६१ टक्के) असून ते जिंतूर तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात व्यसनाधीनतेमुळे आदिवासी कुटुंबावर प्रतिकुल परिणाम होताना आढळून आले आहे. शाारीरिक अनारोग्य, दारिद्र्य, आजार, कमी आयुष्य, कर्ज बाजारीपणा कुटुंबात भांडणे, उत्पन्नामध्ये होणारी घट इत्यादी प्रत्यक्ष परिणाम परभणी जिल्ह्यातील निवडक आदिवासी व्यक्तींवर होताना नमुना पाहणीत दिसून आले आहे.

**४.५३ पिण्याच्या पाण्याची सुविधा :**

पाणी हे एक जीवन आहे असे मानण्यात येते. आरोग्याच्या दृष्टीकोणातून विचार केल्यास व्यक्तीला पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळणे आवश्यक असते. मात्र बहुतांश आदिवासी समाजातील कुटुंब हे जंगलात व दऱ्याखोऱ्यात राहत असल्यामुळे त्यांना शुध्द पिण्याचे पाणी मिळत नाही. अशुध्द पाण्याने अनेक साथीच्या रोगांना बळी पडावे लागते. परभणी जिल्ह्यातील निवडक आदिवासी कुटुंबाला मिळणाऱ्या पिण्याच्या पाण्याची स्थिती खालील तक्यात दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ४.१२**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांच्या गावातील पिण्याच्या पाण्याची स्थिती दर्शविणारा तक्ता**

| पेयजल पुरवठा स्रोत | महिने |
|---|---|
| सार्वजनिक विहिर | १२ |
| नळ | ०८ |
| कुपनलिका | ०५ |
| नदी | ०० |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

तक्ता क्र. ४.१२ मध्ये परभणी जिल्ह्यातील निवडक ३६ गावातील आदिवासी लोकांच्या पिण्याच्या पाण्याची स्थिती दर्शविण्यात आलेली आहे. निवडक ३६ गावातील लोकांना सार्वजनिक विहिरीपासून १२ ही महिने पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असून त्याची टक्केवारी १०० टक्के एवढे आहे. नळ या सुविधा पासून आदिवासी कुटुंबाना ८ महिने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असून त्याची टक्केवारी ६६.६६ टक्के एवढी आहे. तसेच हापसा पासून आदिवासी समाजातील लोकांना केवळ ५ महिने पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण होत असून त्याची टक्केवारी ४१.६६ टक्के एवढी आहे. तसेच नदीद्वारे पाणी पुरवठा होत नाही.

थोडक्यात आदिवासी गावातील लोकांना अजूनही सार्वजनिक विहीरीवरच पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून रहावे लागते.

**४.५ आदिवासी गावात पिण्याच्या पाण्याची स्थिती :**

परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी समाजातील गावात पिण्याच्या पाण्याची स्थिती बिकट आहे. जिल्ह्यातील निवडक गावातील आदिवासी लोकांना पिण्यासाठी उन्हाळयात भंटकती करुन ३ ते ४ किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागते. सतत होणाऱ्या दुष्काळामुळे आदिवासी लोकांच्या गावात पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. परभणी जिल्ह्यातील निवडक आदिवासी गावातील पिण्याच्या पाण्याच्या सुविधाची स्थिती दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ४.१३**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी गावात पिण्याच्या पाण्याच्या सुविधांची स्थिती**

| तालुका | पिण्याच्या पाण्याची सुविधा असणारे गाव | पिण्याची पाण्याची सुविधा नसणारे गाव | एकूण आदिवासी गाव |
|---|---|---|---|
| जिंतूर | ३ (८.३३) | ०१ (२.७७) | ०४ (११.११) |
| सेलू | ३ (८.३३) | ०१ (२.७७) | ०४ (११.११) |
| मानवत | ४ (११.११) | ०० (००) | ०४ (११.११) |

| | | | |
|---|---|---|---|
| पालम | २ (५.५५) | ०२ (५.५५) | ०४ (११.११) |
| पूर्णा | ४ (११.११) | ०० (००) | ०४ (११.११) |
| गंगाखेड | ३ (८.३३) | ०१ (२.७७) | ०४ (११.११) |
| सोनपेठ | ४ (११.११) | ०० (००) | ०४ (११.११) |
| पाथरी | ३ (८.३३) | ०१ (२.७७) | ०४ (११.११) |
| परभणी | ४ (११.११) | ०० (००) | ०४ (११.११) |
| एकूण | ३० (८३.३३) | ०६ (१६.६७) | ३६ (१००.००) |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप** : कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.१३ मध्ये परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी गावातील पिण्याच्या पाण्याच्या सुविधांची स्थिती दर्शविलेली आहे. त्यानुसार ३० आदिवासी गावात पिण्याच्या पाण्याची सुविधा असून त्याची टक्केवारी ८३.३३ एवढी आहे. तर आदिवासी गावात पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणाऱ्या गावांची संख्या ०६ असून त्याची टक्केवारी १६.६७ टक्के एवढी आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६ गावापैकी केवळ ३० (८३.३३ टक्के) गावातच पिण्याच्या पाण्याची सुविधा असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक पिण्याच्या पाण्याची सुविधा असणाऱ्या गावांची संख्या प्रत्येकी ०४ (११.११ टक्के) असून ते मानवत,पुर्णा,सोनपेठ आणि परभणी तालुक्यातून आढळून आले आहे तर सर्वात कमी पिण्याच्या पाण्याची सुविधा असणाऱ्या गावांची संख्या ०२ (५.५५ टक्के) असून ती पालम तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी गावात पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणाऱ्या आदिवासी गावांची संख्या ०६ (१६.६७ टक्के) असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणारे ०२ (५.५५ टक्के) आदिवासी गावे हे पालम तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी पिण्याच्या

पाण्याची सुविधा नसणाऱ्या आदिवासी गावाची संख्या प्रत्येकी १ असून ते जिंतूर, सेलू, गंगाखेड, पाथरी तालुक्यातून आढळून आले आहे.

**४.५.१ पिण्याच्या स्वच्छ पाणी संबंधीत स्थिती :**

स्वच्छ व पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा होने ही मानवी समाजाची एक प्राथमिक गरज निर्माण झाली आहे. काही आदिवासी समाजातील लोक स्वच्छ पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. त्यामुळे दूषित पाण्यामुळे त्यांना अनेक रोगांना बळी पडावे लागते. म्हणून जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होणे हे अत्यंत गरजेचे आहे.

**तक्ता क्र. ४.१४**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी गावात पिण्याच्या स्वच्छ पाणी संबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळणारे आदिवासी कुटुंब | पिण्यासाठी स्वच्छ पाणी न मिळणारे आदिवासी कुटुंब | एकूण आदिवासी कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | २६ (७.२२) | १४ (३.८८) | ४० (११.११) |
| सेलू | २४ (६.६६) | १६ (४.४४) | ४० (११.११) |
| मानवत | ३२ (८.८९) | ०८ (२.२२) | ४० (११.११) |
| पालम | २० (५.५५) | २० (५.५५) | ४० (११.११) |
| पूर्णा | ३४ (९.४४) | ०६ (१.६६) | ४० (११.११) |
| गंगाखेड | २८ (७.७७) | १२ (३.३३) | ४० (११.११) |
| सोनपेठ | ३६ (१०.००) | ०४ (१.११) | ४० (११.११) |
| पाथरी | २७ (७.५) | १३ (३.६१) | ४० (११.११) |
| परभणी | ३३ (९.१६) | ०७ (१.९४) | ४० (११.११) |
| एकूण | २६० (७२.२२) | १०० (२७.७८) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप -** कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र ४.१४ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील नमुना कुटुंबांना मिळणाऱ्या स्वच्छ पिण्याच्या पाण्याची माहिती दर्शविण्यात आलेली आहे. एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळणारे २६० आदिवासी कुटुंब असून त्याची टक्केवारी ७२.२२ टक्के एवढी आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक स्वच्छ पाणी मिळणारे ३६ (१० टक्के) आदिवासी कुटुंब हे सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळणारे २० (५.५५) आदिवासी कुटुंब हे पालम तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी स्वच्छ पिण्यास पाणी न मिळणारे १०० आदिवासी कुटुंब असून त्याची टक्केवारी २७.७८ टक्के एवढी आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक स्वच्छ पाणी पिण्यास न मिळणारे आदिवासी कुटुंब १६ (४.४४) असून ते सेलू तालुक्यातून आढळून आले. तर सर्वात कमी स्वच्छ पाणी न मिळणारे आदिवासी कुटुंबांची संख्या ०४ (१.११ टक्के) असून ते सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात आदिवासी कुटुंबाना पिण्यासाठी बाराही महिने विहिरीपासून आणि ०८ महिने पाणी नळाद्वारे असते. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे जलशुद्धीकरण प्रक्रिया केलेले नसते. तसेच ते क्लोरिनयुक्त नसल्याने त्यांना विविध रोगांना बळी पडावे लागते. अशुद्ध पाण्यापासून अनेक आजार उद्‌भवत असल्याने आदिवासी लोकांना याची माहिती नाही.

**४.६ शौचालया संबंधी स्थिती :**

ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्याची स्थिती सुधारावी आणि राहणीमानात सुधारणा व्हावी. यासाठी पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या वेगवेगळया योजनेतून (गाव हागणदारी मुक्तीसाठी) शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर परभणी जिल्ह्यातील ३६० नमुना आदिवासी कुटुंबापैकी किती

कुटुंबाकडे शौचालय सुविधा उपलब्ध आहे हे खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्र ४.१५**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबात शौचालय सुविधा असणाऱ्या कुटुंबांची स्थिती**

| **तालुका** | **शौचालय असणारे कुटुंब.** | **शौचालय नसणारे कुटुंब** | **एकूण आदिवासी कुटुंब** |
|---|---|---|---|
| जिंतूर | ०४ (१.११) | ३६ (१०.००) | ४० (११.११) |
| सेलू | ०६ (१.६६) | ३४ (९.४४) | ४० (११.११) |
| मानवत | ०३ (०.८३) | ३७ (१०.२७) | ४० (११.११) |
| पालम | ०६ (१.६६) | ३४ (९.४४) | ४० (११.११) |
| पूर्णा | ०३ (०.८३) | ३७ (१०.२७) | ४० (११.११) |
| गंगाखेड | ०७ (१.९४) | ३३ (९.१६) | ४० (११.११) |
| सोनपेठ | ०४ (१.११) | ३६ (१०.००) | ४० (११.११) |
| पाथरी | ०६ (१.६६) | ३४ (९.४४) | ४० (११.११) |
| परभणी | ०५ (१.३८) | ३५ (९.७२) | ४० (११.११) |
| एकूण | ४४ (१२.२२) | ३१६ (८७.७८) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत** : प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप** - कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१५ मध्ये परभणी जिल्ह्यातील तालुकानिहाय आदिवासी कुटुंबाकडे उपलब्ध असलेल्या शौचालयाची स्थिती दर्शविण्यात आलेली आहे. आदिवासी समाजातील कुटुंबाकडे शौचालये संबंधी माहिती घेतली असता असे दिसून आले की, ३६० आदिवासी कुटुंबापैकी ४४ कुटुंबांकडे शौचालये सुविधा असल्याचे आढळून आले असून त्याची टक्केवारी १२.२२ टक्के एवढी आहे. तर शौचालय सुविधा नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३१६ असून त्याची टक्केवारी ८७.७६ टक्के एवढी आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी ४४ (१२.२२ टक्के) कुटुंबाकडे शौचालय सुविधा उपलब्ध असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक शौचालय असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०७ (१.९४ टक्के) असून ती गंगाखेड तालुक्यातून आढळून आली आहे. तर सर्वात कमी शौचालय सुविधा असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०३ (०.८३ टक्के) असून ती मानवत तालुक्यातून आढळून आली आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी शौचालय सुविधा नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३१६ (८७.७८ टक्के) असून तालुकानिहाय अभ्यास केला असता त्यात सर्वाधिक शौचालय सुविधा नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३७ (१०.२७ टक्के) असून ते पुर्णा तालुक्यात आढळून आले आहे. तर सर्वात कमी शौचालय नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३३ (९.१६ टक्के) असून ते गंगाखेड तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात संपूर्ण गाव हागणदारी मुक्त होण्यासाठी शासनाद्वारे राबविली जाणारी हागणदारी मुक्त योजना ही केवळ कागदोपत्री आहे. या योजनेचा लाभ वास्तविक लाभार्थीपर्यंत मिळालेला नाही. परिणाम स्वरूप शौचालय सुविधांच्या अभावी आदिवासी स्त्रियांना आणि वृद्धांना रस्त्यावरच नाईलाजाने शौचालय करावे लागते. उघड्यावरील शौचालयामुळे अनेक रोगांचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता बळावते. म्हणून शासनाने या योजनेची सक्तीने अंमलबजावणी कशी होईल याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

**४.६.१ आदिवासी कुटुंब वापरत असलेल्या शौचालय संबंधी स्थिती :**

परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबांची शौचालय वापरासंबंधी पाहणी केली असता शौचालयाचा वापर हा मूळात कमी प्रमाणात आहे. हे खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ४.१६**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील वापरत असलेल्या शौचालया संबंधी स्थिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | शौचालय वापरत असलेले कुटुंब | शौचालय वापरत नसलेले कुटुंब | एकूण आदिवासी कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | ०३ (६.८१) | ०१ (२.२७) | ०४ (९.०९) |
| सेलू | ०५ (११.३६) | ०१ (२.२७) | ०६ (१३.६३) |
| मानवत | ०३ (६.८१) | ०० (००.००) | ०३ (६.८१) |
| पालम | ०४ (९.०९) | ०२ (४.५४) | ०६ (१३.६३) |
| पूर्णा | ०२ (४.५४) | ०१ (२.२७) | ०३ (६.८१) |
| गंगाखेड | ०५ (११.३६) | ०२ (४.५४) | ०७ (१५.९०) |
| सोनपेठ | ०३ (६.८१) | ०१ (२.२७) | ०४ (९.०९) |
| पाथरी | ०४ (९.०९) | ०२ (४.५४) | ०६ (१३.६३) |
| परभणी | ०३ (६.८१) | ०२ (४.५४) | ०५ (११.३६) |
| एकूण | ३२ (७२.७२) | १२ (२७.२८) | ४४ (१००.००) |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप -** कंसाातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्र. ४.१६ मध्ये परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी समाजातील कुटुंब वापरत असलेल्या शौचालय संबंधीत माहिती दर्शविण्यात आली आहे. शौचालयाचा वापर करीत असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३२ असून त्याची टक्केवारी ७२.७२ टक्के एवढी आहे. तर शौचालयाचा वापर करीत नसलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या १२ असून त्याची टक्केवारी २७.२८ टक्के एवढी आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० कुटुंबापैकी ३२ (७२.७२ टक्के) आदिवासी कुटुंब हे शौचालयाचा वापर करीत असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक शौचालयाचा वापर करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या प्रत्येकी ०५ (११.३६ टक्के) असून ते सेलू आणि गंगाखेड तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी शौचालयाचा वापर करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०२ (४.५४ टक्के) असून ते पूर्णा तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी शौचालयाचा वापर न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १२ (२७.२८ टक्के) आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक शौचालयाचा वापर न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०२ (४.५४ टक्के) असून ते प्रत्येकी पालम, गंगाखेड, पाथरी आणि परभणी या तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी शौचालयाचा वापर न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या शून्य असून ते मानवत तालुक्यातून दिसून आले आहे.

थोडक्यात शौचालय असलेल्या आदिवासी कुटुंबापैकी काही शौचालयाचा वापर स्नानगृह, सरपण ठेवणे, शासकीय अनुदानाचा लाभ घेण्यासाठी तसेच इतर कारणाकरिता वापर करत असल्याचे निर्देशनास आले. परिणामस्वरूप शौचालय असले तरी त्यामधील फार कमी कुटुंब शौचालयाचा वापर करीत आहे असे सर्वेक्षणाच्या दरम्यान आढळून आले आहे.

**४.७ परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील स्नानगृहा विषयी माहिती :**

परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाकडे उपलब्ध असलेल्या स्नानगृहाची माहिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ४.१७**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील स्नानगृहाची स्थिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | स्नानगृह असणारे आदिवासी कुटुंब | स्नानगृह नसणारे आदिवासी कुटुंब | एकूण आदिवासी कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | १५ (४.१६) | २५ (६.९४) | ४० (११.११) |
| सेलू | १९ (५.२७) | २१ (५.८३) | ४० (११.११) |
| मानवत | १६ (४.४४) | २४ (६.६६) | ४० (११.११) |
| पालम | १४ (३.८८) | २६ (७.२२) | ४० (११.११) |
| पूर्णा | १८ (५.००) | २२ (६.११) | ४० (११.११) |
| गंगाखेड | १३ (३.६१) | २७ (७.५) | ४० (११.११) |

| | | | |
|---|---|---|---|
| सोनपेठ | १९ (५.२७) | २१ (५.८३) | ४० (११.११) |
| पाथरी | १५ (४.१६) | २५ (६.९४) | ४० (११.११) |
| परभणी | १८ (५.००) | २२ (६.११) | ४० (११.११) |
| एकूण | १४७ (४०.८३) | २१३ (५९.१७) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत -** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप -** कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१७ मध्ये, परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील स्नानगृहाची स्थिती दर्शविली आहे नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी १४७ आदिवासी कुटुंबाकडे स्नानगृह असल्याचे आढळून आले असून त्याची टक्केवारी ४०.८३ टक्के एवढी आहे. तर स्नानगृह नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २१३ असून त्याची टक्केवारी ५९.१७ टक्के एवढी आहे.

नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी स्नानगृह असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १४७ असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक स्नानगृह असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १९ (५.२७ टक्के) असून ते सेलू आणि सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी स्नानगृह असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या १३ (३.६१ टक्के) असून ते गंगाखेड तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी स्नानगृह नसणाऱ्या आदिवासी कुटुंबाची पाहणी केली असता २१३ (५९.१७ टक्के) कुटुंबाकडे स्नानगृह नसल्याचे आढळून आले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक स्नानगृह नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २७ (७.५ टक्के) असून ते गंगाखेड तालुक्यातून आढळून आले. तर सर्वात कमी स्नानगृह नसणाऱ्या आदिवासी असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या प्रत्येकी २१ (५.८३ टक्के) असून ते सेलू आणि सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात आदिवासी समाजातील कुटुंबाच्या घरी स्वातंत्र्य स्नानगृह कमी प्रमाणात दिसून आले आहेत.

परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबामध्ये स्वतंत्र स्नानगृहाची सोय नसल्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे घरामधील पुरूष मंडळी सकाळी लवकर उठण्याच्या पूर्वी महिला स्नान करतात तसेच घराच्या बाजूने छोटासा स्वरूपात आसरा बांधलेला असतो. त्यामुळे आदिवासी कुटुंबाना स्वतंत्र अशा स्नानगृहाची आवश्यकता भासत असल्याचे दिसून येत नाही.

## ४.८ आदिवासी समाजातील मुला-मुलींच्या विवाह संबंधीची स्थिती :

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या ३६० नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांची पाहणी केली असता असे दिसून येते की, आदिवासी समाजामध्ये निरक्षरतेमुळे स्त्रीकडे पाहण्याचा विशाल दृष्टीकोनाचा अभाव मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अल्पवयातच विवाह (बालविवाह) करण्याची प्रथा अधिक प्रमाणात दिसून येते. खालील तक्त्या मध्ये आदिवासी समाजातील मुला-मुलींच्या विवाहाच्या वेळी वयाची स्थिती दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ४.१८**

**परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील मुला-मुलींच्या विवाहाच्या वेळी वयाची स्थिती**

| मुलाचे वय (वर्ष) | कुटुंबांची संख्या | टक्केवारी | मुलीचे वय (वर्ष) | कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १६-१८ | ८२ | २२.७८ | १४-१६ | ३०५ | ८४.७२ |
| १८-२० | १९६ | ५४.४४ | १६-१८ | ४६ | १२.७८ |
| २०-२२ | ६३ | १७.६ | १८-२० | ०९ | २.६ |
| २२-२४ | १७ | ४.७२ | २०-२२ | ०० | ००.०० |
| २५ पुढे | ०२ | ०.५५ | २२ पुढे | ०० | ००.०० |
| एकूण | ३६० | १००.०० | एकूण | ३६० | १००.०० |

**टीप :** कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१८ मध्ये परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील मुला-मुलींच्या विवाहाच्या वेळी असणाऱ्या वयाची स्थिती दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी ८२ (२२.७८ टक्के) कुटुंबातील मुलांचे विवाह वयाच्या १६-१८ वर्ष दरम्यान झालेले आहे. १९६ (५४.४४ टक्के) कुटुंबातील मुलांचे विवाह वयाच्या १८-२० वर्ष दरम्यान झालेले आहे. ६३ (१७.६ टक्के) कुटुंबातील मुलांचे विवाह २०-२२ वर्ष दरम्यान झालेले आहे. १७ (४.७२ टक्के) कुटुंबातील मुलांचे विवाह २२-२४ वर्ष दरम्यान झालेले आहे. आणि ०२ (०.५५) कुटुंबातील मुलाचे विवाह २५ वर्षच्या नंतर झालेले आहे. म्हणजेच नमुना आदिवासी कुटुंबातील मुलांचे वयाच्या २१ व्या वर्षाच्या अगोदर विवाह झालेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या जास्त आहे. त्यांचे म्हणजेच बालवयातच विवाह करण्याची प्रथा आदिवासी कुटुंबात आढळते.

जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी ३०५ (८४.७२ टक्के) आदिवासी कुटुंबातील मुलीचे विवाह हे वयाच्या १४-१६ वर्ष दरम्यान झालेले आहेत. ४६ (१२.७८ टक्के) आदिवासी कुटुंबातील मुलचे विवाह हे १६-१८ वर्ष वय दरम्यान झालेले आहेत. ९ (२.६टक्के) नमुना आदिवासी कुटुंबातील मुलीचे विवाह वयाच्या १८-२० वर्ष दरम्यान झालेले आहे. आणि २० वर्षानंतर विवाह झालेल्या मुलीची संख्या संशोधनादरम्यान आढळून आली नाही. म्हणजेच नमुना आदिवासी कुटुंबातील मुलीचे विवाह हे बालवयातच मोठ्या प्रमाणात केले जाते. तसेच परिणामी बालवयात मुलीचे विवाह झाल्यामुळे आरोग्यविषयक भविष्यात आरोग्यविषयक समस्यांांना सामोरे जावे लागते.

एकंदरीत आदिवासी समाजात निरक्षरता, दारिद्रय, अंधश्रध्दा, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव, स्त्रियांना पुरुषा बरोबरीची वागणूक न देणे यामुळे बाल विवाहाचे प्रमाण अधिक आहेत. जे कुटुंब, साक्षर, नोकरदार व आधुनिक विचारसरणीचे आहेत.

तेच कुटुंबप्रमुख आपल्या मुलाचे विवाह २१ वर्षापेक्षा जास्त वय असतांना करतात तसेच मुलीचे लग्न १८ वर्षानंतर करताना दिसून येते.

**४.८.१ हुंडा पध्दती :**

आधुनिक काळात सर्वच समाजात हुंडा पद्धतीचे प्राबल्य वाढत चालले आहे. हुंडा देणे किंवा घेणे हे प्रतिष्ठेचे लक्षण बनले आहे. त्यामुळे आदिवासी समाजात या प्रथेचा शिरकाव झाला आहे. परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाचा अभ्यास केला असे आढळून आले की, या समाजात हुंडा पद्धती ही एक प्रतिष्ठा होऊन बसली आहे.

**तक्ता क्र. ४.१९**

**परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील हुंडाविषयक स्थिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | हुंडा दिला व घेतला जाणाने कुटुंबे | हुंडा दिला व घेतला जात नसणारे कुटुंब | एकूण कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | ३० (८.३३) | १० (२.७७) | ४० (११.११) |
| सेलू | ३३ (९.१६) | ०७ (१.९४) | ४० (११.११) |
| मानवत | २९ (८.०५) | ११ (३.०५) | ४० (११.११) |
| पालम | २६ (७.२२) | १४ (३.८८) | ४० (११.११) |
| पूर्णा | ३२ (८.८८) | ०८ (२.२२) | ४० (११.११) |
| गंगाखेड | २७ (७.५) | १३ (३.६१) | ४० (११.११) |
| सोनपेठ | २८ (७.७७) | १२ (३.३३) | ४० (११.११) |
| पाथरी | ३१ (८.६१) | ०९ (२.५) | ४० (११.११) |
| परभणी | ३३ (९.१६) | ०७ (१.९४) | ४० (११.११) |
| एकूण | २६९ (७४.७२) | ९१ (२५.२८) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकड्यामध्ये टक्केवारी दर्शविली आहे.

वरील ४.१९ वरून तक्त्यामध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील तालुकानिहाय हुंडाविषयक स्थिती दर्शविण्यात आलेली आहे. एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी मुला-मुलींच्या लग्नात हुंडा दिला / घेतला अशा कुटुंबाची संख्या २६९ असून त्यांची टक्केवारी ७४.७२ टक्के एवढी आहे. समाजात हुंडा दिला-घेतला जात नाही अशी प्रतिक्रिया ९१ आदिवासी कुटुंबांनी व्यक्त केली असून त्याची टक्केवारी २५.२८ टक्के एवढी आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी हुंडा दिला किंवा घेतला जातो. अशी प्रतिक्रिया दर्शविणाऱ्या आदिवासी कुटुंबाचा तालुकानिहाय अभ्यास केला असता  सर्वाधिक हुंडा घेणाऱ्या किंवा देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या प्रत्येकी ३३ (९.१६ टक्के) असून ते सेलू आणि परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी हुंडा देणाऱ्या-घेणाऱ्या कुटुंबांची संख्या २६ (७.२२ टक्के) असून ते पालम तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी हुंडा दिला-घेतला जात नाही असे मत व्यक्त करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ९१ (२५.२८ टक्के) असून तालुका निहाय अभ्यास केला असता सर्वाधिक हुंडा दिला-घेतला न जाणारे १४ (३.८८ टक्के) कुटुंब हे पालम तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी हुंडा दिला- घेतला न जाणाऱ्या कुटुंबाची संख्या ७ (१.९४ टक्के) असून ते सेलू आणि परभणी तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात हुंडा देणे किंवा घेणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. हुंडा घेतला नाही तर समाज वेगळ्या दृष्टीने पाहतात असे हुंडा घेणाऱ्याने मत व्यक्त केले आहे. हुंडा का दिला जातो असा प्रश्न वधू मंडळींना प्रश्न विचारला असता चांगला वर मिळतो. जर हुंडा नाही म्हटले तर मुलींचे विवाह होऊ शकत नाही या भीतीने हुंडा दिला जातो. म्हणून ही वाईट प्रथा या समाजात टिकून आहे. याचे वाईट परिणाम हे मुलीच्या आईवडिलांना आणि कालांतराने मुलींना भोगावे लागतात.

## ४.९ निवासा संबंधी माहिती :

मानवाच्या मूलभूत गरजापैकी निवारा ही एक गरज अत्यंत महत्वाची गरज आहे. त्यावर त्यांची सामाजिक स्थिती अवलंबून असते. परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांची निवास स्थिती किंवा राहत्या घराची स्थिती पाहण्यासाठी ३६० नमुना कुटुंबाची पाहणी केली असता बहुतांश आदिवासी कुटुंबे हे झोपडी व मातीचे बांधकाम असलेल्या घरामध्ये वास्तव्य करीत असल्याचे दिसून आले आहे. त्यांचे स्वरूप खालील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र.४.२०**
**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील निवासा संबंधित माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | झोपडी | मातीचे बांधकाम | विटापत्राचे बांधकाम | पक्के बांधकाम | एकूण कुटुंब |
|---|---|---|---|---|---|
| जिंतूर | ०१ (०.२७) | ३१ (८.६१) | ०७ (१.९४) | ०१ (०.२७) | ४० (११.११) |
| सेलू | ०३ (०.८३) | २८ (७.७८) | ०८ (२.२२) | ०१ (०.२७) | ४० (११.११) |
| मानवत | ०१ (०.२७) | ३२ (८.८९) | ०५ (१.३९) | ०२ (०.५५) | ४० (११.११) |
| पालम | ०२ (०.५५) | ३० (८.३३) | ०८ (२.२२) | ०० (००) | ४० (११.११) |
| पूर्णा | ०१ (०.२७) | ३३ (९.१६) | ०५ (१.३९) | ०१ (०.२७) | ४० (११.११) |
| गंगाखेड | ०१ (०.२७) | २९ (८.०५) | ०८ (२.२२) | ०२ (०.५५) | ४० (११.११) |
| सोनपेठ | ०२ (०.५५) | २८ (७.७८) | ०८ (२.२२) | ०२ (०.५५) | ४० (११.११) |
| पाथरी | ०१ (०.२७) | ३१ (८.६१) | ०७ (१.९४) | ०१ (०.२७) | ४० (११.११) |
| परभणी | ०० (००) | ३४ (९.४४) | ०५ (१.३९) | ०१ (०.२७) | ४० (११.११) |
| एकूण | १२ (३.३३) | २७६ (७६.६७) | ६१ (१६.९४) | ११ (३.०५) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी
**टीप :** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्त क्र. ४.२० मध्ये परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील लोकांच्या राहत्या घरांच्या स्वरूपाविषयीची स्थिती दर्शविलेली आहे. त्यानुसार नमुना कुटुंबापैकी १२ आदिवासी कुटुंबाकडे झोपडी असून त्याची टक्केवारी ३.३३ टक्के एवढी आहे. तालुका निहाय अभ्यास केला असता. सर्वाधिक झोपडी असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३ (०.८३ टक्के) असून ते सेलू तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी झोपडी असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०० असून ते परभणी तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी २७६ (७६.६७ टक्के) आदिवासी कुटुंबाच्या घराचे स्वरूप हे मातीच्या बांधकाम आहे. त्याचे तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक मातीचे बांधकाम असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३४ (९.४४ टक्के) असून ते परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी मातीचे बांधकाम असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या २८ (७.७८ टक्के) असून ते सेलू आणि सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी विटापत्राच्या घराविषयी माहिती घेतली असता विटा व पत्राचे घर असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ६१ (१९.९४ टक्के) आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक विटा व पत्राचे घर असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०८ (२.२२ टक्के) असून ते सेलू, पालम, गंगाखेड, सोनपेठ तालुक्यातून आढळून आले. तर सर्वात कमी विटा व पत्रे असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या प्रत्येकी ५ (१.३९ टक्के) असून ते मानवत, पूर्णा व परभणी तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी पक्क्या स्वरूपाच्या घराविषयी माहिती घेतली असता ११ (३.०५ टक्के) आदिवासी कुटुंबाची घरे ही पक्के बांधकाम  आहे. तालुकानिहा वर्गीकरण केले असता सर्वाधिक पक्क्या स्वरूपाचे घरे असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २ (०.५५ टक्के) कुटुंब हे मानवत,

गंगाखेड, सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी पक्या स्वरूपाची घरे असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या एक (०.२७ टक्के) असून ते जिंतूर, सेलू, पूर्णा, पाथरी, परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर पालम तालुक्यातून एकही कुटुंबाकडे पक्या स्वरूपाचे घरे असल्याचे दिसून आले नाही.

थोडक्यात परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाचे मातीचे बांधकाम असणाऱ्या घरांची संख्या सर्वात जास्त असून पक्क्या स्वरूपाचे बांधकाम असणाऱ्या घराची संख्या कमी आहे.

कारण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी समाजातील घरे ही कच्च्या मातीचे बांधकाम अधिक असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या उत्पन्नांचे आर्थिक स्रोत कमी आहे. त्यामुळे उत्पन्न पातळी सुद्धा कमी आहे. तसेच आदिवासी समाजातील लोकांची पूरक आणि जोडधंद्याची स्थिती फारशी चांगली नाही. परिणामस्वरूप त्यांच्या घरांची स्थिती चांगली नसल्याचे दिसून आले आहे.

**४.१० पोशाख वापरा संबंधी स्थिती :**

मानवाच्या राहणीमानावर अनेक घटकाचा परिणाम होत असल्याचे दिसून येते. त्यापैकी पोशाख हा एक महत्वाचा घटक आहे. परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांची पाहणी केली असता आदिवासी कुटुंब हे पारंपरिक पध्दतीचे पोशाख परिधान करत असल्याचे आढळून आले आहे. ज्यामध्ये वयोवृध्द पुरुषामध्ये धोतर-खमीस तर वयोवृध्द स्त्रियांमध्ये नऊवारी, सहावारी साडी परिधान करताना तसेच मुले मात्र शर्ट-पॅट, आणि मुली पंजाबी पोशाख वापरत असल्याचे दिसून आले. परभणी जिल्ह्यातील ३६० नमुना आदिवासी कुटुंबातील लोकांची पोशाख विषयक स्थितीचे अध्ययन केले असता आढळून आलेली स्थिती खालील तक्तामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ४.२१**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील पारंपरिक पोशाखा संबंधी माहिती दर्शविणारा तक्ता.**

| तालुका | पारंपरिक पोशाख वापरणारे कुटुंबे | पारंपरिक पोशाख न वापरणारे कुटुंबे | एकूण कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | १० (२.७८) | ३० (८.३३) | ४० (११.११) |
| सेलू | ०८ (२.२२) | ३२ (८.८८) | ४० (११.११) |
| मानवत | १२ (३.३३) | २८ (७.७७) | ४० (११.११) |
| पालम | ११ (३.०५) | २९ (८.०५) | ४० (११.११) |
| पूर्णा | ०७ (१.९४) | ३३ (९.१६) | ४० (११.११) |
| गंगाखोड | ०९ (२.५) | ३१ (८.६१) | ४० (११.११) |
| सोनपेठ | ११ (३.०५) | २९ (८.०५) | ४० (११.११) |
| पाथरी | ०८ (२.२२) | ३२ (८.८८) | ४० (११.११) |
| परभणी | १२ (३.३३) | २८ (७.७७) | ४० (११.११) |
| एकूण | ८८ (२४.४४) | २७२ (७५.५६) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत -** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप -** कंसातील आकडेवारीही टक्केवारी दर्शविते

तक्ता क्र. ४.२१ मध्ये आदिवासी समाजातील पुरुष महिला यांच्या पोशाखा संबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. पारंपरिक पोशाख वापरणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ८८ असून त्याची टक्केवारी २४.४४ टक्के एवढी आहे. तर पारंपरिक पोशाख न वापरणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २७२ असून त्याची टक्केवारी ७५.५६ टक्के आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी ८८ कुटुंब पारंपरिक पोशाख वापरत असून तालुकानिहाय विचार केला असता सर्वाधिक पारंपरिक पोशाख वापरणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या १२ (३.३३ टक्के) असून ते मानवत

आणि परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी पारंपरिक पोशाख वापरणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०७ (१.९४) असून ते पुर्णा तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी पैकी २७२ कुटुंब पारंपारिक पोशाख न वापरणारे आदिवासी कुटुंब असून तालुकानिहाय विचार केला असता सर्वाधिक पारंपारिक पोशाख न वापरणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३३ (९.१६) असून ते पूर्णा तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी पारंपरिक पोशाख न वापरणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २८ (७.७७ टक्के) असून ते मानवत तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील लोकांचा पारंपरिक पेहराव पद्धती कमी होत असून त्यांची जागा आधुनिक पेहराव पद्धती होत असल्याचे सर्वेक्षणाच्या साह्याने आढळून आले आहे. म्हणजेच आदिवासी लोकांच्या पेहरावात बदल होत असल्याचे स्पष्ट होते.

**४.११ नवस विषयक स्थिती :**

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे या समाजातील लोकांमध्ये दैववाद, अंधश्रध्दा, रूढी, प्रथा, नवस इत्यादीचे प्रमाण जास्त दिसून येते. एखाद्या कामाचे इच्छित फळ देवामुळे प्राप्त झाले किंवा नवसामुळे आपली प्रगती झाली किंवा आलेले संकट टळले अशा प्रकारच्या भावना जिल्ह्यातील आदिवासी समाजामध्ये दिसून येतात. त्यामुळे देवांना खूश करण्यासाठी नवस करण्याची प्रथा आजही जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबामध्ये टिकून आहे.

## तक्ता क्र. ४.२२

## परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील नवस विषयक स्थिती दर्शविणारा तक्ता

| तालुका | देवाला नवस करणारे कुटुंबे | देवाला नवस न करणारे कुटुंबे | एकूण कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | ३४ (९.४४) | ०६ (१.६६) | ४० (११.११) |
| सेलू | ३२ (८.८८) | ०८ (२.२२) | ४० (११.११) |
| मानवत | ३६ (१०.००) | ०४ (१.११) | ४० (११.११) |
| पालम | ३७ (१०.२७) | ०३ (०.८३) | ४० (११.११) |
| पूर्णा | ३५ (९.७२) | ०५ (१.३८) | ४० (११.११) |
| गंगाखेड | ३३ (९.१६) | ०७ (१.९४) | ४० (११.११) |
| सोनपेठ | ३४ (९.४४) | ०६ (१.६६) | ४० (११.११) |
| पाथरी | ३० (८.३३) | १० (२.७७) | ४० (११.११) |
| परभणी | ३५ (९.७२) | ०५ (१.३८) | ४० (११.११) |
| एकूण | ३०६ (८५.००) | ५४ (१५) | ३६० (१००) |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप** : कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र ४.२२ मध्ये परभणी जिल्ह्यातील देवाला नवस करत असलेल्या आदिवासी कुटुंबाची स्थिती दर्शविण्यात आली आहे. नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी ३०६ आदिवासी कुटुंब हे देवाला नवस करत असून त्याची टक्केवारी ८५ टक्के एवढी आहे. तर देवाला नवस न करणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या ५४ असून त्याची टक्केवारी १५ टक्के एवढी आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी देवाला करत असलेल्या नवसा विषयी माहिती घेतली असता सर्वाधिक देवाला नवस करणाऱ्या

आदिवासी कुटुंबांची संख्या ३७ (१०.२७ टक्के) असून ते पालम तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी देवाला नवस करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३० (८.३३ टक्के) असून ते पाथरी तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी देवाला नवस न करणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या ५४ (१५ टक्के) असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक देवाला नवस न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १० (२.७७ टक्के) असून ते पाथरी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी देवाला नवस न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०३ (०.८३ टक्के) असून ते पालम तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात आदिवासी समाजात देवावर श्रध्दा असून 'देवा शिवाय झाडाचे पान सुध्दा हालू शकत नाही' अशी म्हणी आहे. नवस हे नारळ फोडणे, वारी करणे, दान देणे, यात्रा करणे इत्यादी स्वरूपाचे ते करताना दिसून येतात.

थोडक्यात परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजामध्ये देवाला नवस करणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले आहे. नवस पूर्ण करण्यासाठी सावकार कडून कर्ज घेण्याचे प्रमाण वाढत आहे. म्हणून या विधीविषयी लोकामध्ये जाणीव जागृती होणे गरजेचे आहे.

**४.१२ वारसा हक्काविषयी माहिती :**

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांना वारसा हक्कांविषयी माहिती घेतली असता उत्तरदात्यांनी फक्त मुलानांच वारसा हक्क मिळत असल्याचे सांगितले. परंतु कायदेशीर वारसा हक्क नोंदणीत मुलींचीही नोंद होत असून स्त्रिया विवाहानंतर दुसऱ्या कुटुंबात जाणार असतात. पित्याच्या मृत्यूनंतर मुले (भाऊ-बहीन) ही संपत्तीची वारसा ठरत असली तरी विवाहीत आपल्या वाट्याची संपत्ती समंती पत्राने भावाला सुपूर्द करत असते परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील मुलींना दिलेल्या वारसा हक्कांची स्थिती खालील प्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ४.२३**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांची मुलींना वारसा हक्क देण्यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | वारसा हक्क देणारे कुटुंब | वारसा हक्क न देणारे कुटुंब | एकूण कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | ०२ (०.५५) | ३८ (१०.५५) | ४० (११.११) |
| सेलू | ०१ (०.२७) | ३९ (१०.८३) | ४० (११.११) |
| मानवत | ०० (००) | ४० (११.११) | ४० (११.११) |
| पालम | १ (०.२७) | ३९ (१०.८३) | ४० (११.११) |
| पूर्णा | १ (०.२७) | ३९ (१०.८३) | ४० (११.११) |
| गंगाखेड | २ (०.५५) | ३८ (१०.५५) | ४० (११.११) |
| सोनपेठ | ०० (००) | ४० (११.११) | ४० (११.११) |
| पाथरी | ०२ (०.५५) | ३८ (१०.५५) | ४० (११.११) |
| परभणी | ०३ (०.८३) | ३७ (१०.२७) | ४० (११.११) |
| एकूण | १२ (३.३३) | ३४८ (९६.६७) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत -** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.२३ मध्ये परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींच्या वारसा हक्कांसबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी मुलींना वारसा हक्क दिला जाणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १२ असून त्याची टक्केवारी ३.३३ टक्के एवढी आहे. तर वारसा हक्क न दिल्या जाणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३४८ असून त्याची टक्केवारी ९६.८७ टक्के एवढी आहे. तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक मुलींना वारसा हक्क दिल्या जाणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०३ (०.३३ टक्के) असून ते परभणी तालुक्यातून आढळून आले. तर

मानवत आणि सोनपेठ तालुक्यातील एकाही कुटुंबांनी मुलीना वारसा दिलेला सर्वेक्षणात आढळून आले नाही.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी वारसा हक्क न दिल्या जाणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या ३४८ (९६.८७ टक्के) आहे. तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक वारसा हक्क न दिल्या जाणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या प्रत्येकी ४० (११.११ टक्के) असून ते मानवत आणि सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी मुलींना वारसा हक्क न देणारे आदिवासी कुटुंबांची संख्या ३७ (१०.२७ टक्के) असून ते परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. थोडक्यात जिल्ह्यातील आदिवासी समाजातील लोक मुलींना वारसा हक्क कमी प्रमाणात देतात हे स्पष्ट होते.

**४.१३ देवतावर विश्वास असणाऱ्या संबंधी माहिती :**

परभणी जिल्ह्यातील आदिवासी लोकांची देवावर श्रध्दा आहे. आदिवासी समाजाची कुलदैवता ही विभिन्न स्वरूपाची असून ते ग्रामीण भागातील इतर देवदेवता मानतात. तसेच निसर्गातील वृक्ष प्राणीला देवमानून त्यावर श्रध्दा ठेवतात. जंगलात व डोंगरदऱ्यात राहत असल्यामुळे हिंसक प्राण्यापासून संरक्षण मिळावे यासाठी देवावर श्रध्दा ठेवतात. हिंदू धर्मातील सण, उत्सव व उपवास करतात. यासारख्या माध्यमाद्वारे आदिवासी समाजातील लोक देवदेवतावर श्रध्दा ठेवताना दिसून येतात.

**तक्ता क्र. ४.२४**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांची देवावर श्रध्दा विषयी स्थिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | देवावर श्रद्धा असणारे कुटुंब | देवावर श्रद्धा नसणारे कुटुंब | एकूण कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | ३४ (९.४४) | ०६ (१.६६) | ४० (११.११) |
| सेलू | ३६ (१०.००) | ०४ (१.११) | ४० (११.११) |
| मानवत | ३५ (९.७२) | ०५ (१.३८) | ४० (११.११) |

| | | | |
|---|---|---|---|
| पालम | ३२ (८.८८) | ०८ (२.२) | ४० (११.११) |
| पूर्णा | ३७ (१०.२७) | ०३ (०.८३) | ४० (११.११) |
| गंगाखेड | ३२ (८.८८) | ०८ (२.२२) | ४० (११.११) |
| सोनपेठ | ३४ (९.४४) | ०६ (१.६६) | ४० (११.११) |
| पाथरी | ३७ (१०.२७) | ०३ (०.८३) | ४० (११.११) |
| परभणी | ३१ (८.६१) | ०९ (२.५) | ४० (११.११) |
| एकूण | ३०८ (८५.५६) | ५२ (१४.४४) | ३६० |

**स्त्रोत** -प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप** : कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.२४ मध्ये, परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील लोकांची देवावरील श्रध्दा आणि विश्वास या संबंधीत माहिती दर्शविलेली आहे. एकूण नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी ३०८ (८५.५६ टक्के) कुटुंबाची देवावर विश्वास/ श्रद्धा असून ५२ (१४.४४ टक्के) आदिवासी कुटुंबाची देवावर श्रद्धा/ विश्वास १४.४४ नाही तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक देवाला न मानणाऱ्या आदिवासी कुटुंबांची सर्वाधिक संख्या ०९ (२.५ टक्के) असून ती परभणी तालुक्यातून आढळून आले आहे तर देवाला न मानणाऱ्या आदिवासी कुटुंबांची सर्वात कमी संख्या ०३ (०.८३) असून ते पूर्णा आणि पाथरी तालुक्यातून आढळून आले आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता देवाला मानणाऱ्या आदिवासी कुटुंबांची सर्वाधिक संख्या ३७ (७०.२७) असून ते प्रत्येकी पूर्णा, पाथरी तालुक्यात आढळून आली असून आदिवासी कुटुंबांची संख्या ३१ (८.३१) असून ती परभणी तालुक्यात आढळून आली आहे.

थोडक्यात आदिवासी समाजातील लोकांची देवावर श्रध्दा असून देवावर श्रद्धा ठेवल्यामुळे मानसिक शांती मिळते. तसेच येणाऱ्या संकटाचे निवारण होते आणि कुटुंबाला सुखशांती लाभते असे मत व्यक्त केले आहे.

थोडक्यात परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाज हा मोठ्या प्रमाणावर धार्मिक व दैववादी आहे. आदिवासी समाजात बहुतांश लोक हिंदू धर्मातील (मारूती, विठ्ठल, तुळजाभवानी तसेच निसर्गातील देवदेवता) या सर्व देवदेवताना मानणारे आहेत.

**४.१४ आदिवासी कुटुंबातील मतदान विषयक स्थिती :**

भारताच्या लोकशाही शासन व्यवस्थेत मतदान प्रक्रियेला विशेष स्थान आहे. मात्र अज्ञानामुळे बऱ्याच आदिवासी लोकांमध्ये मतदान विषयी जागृती असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे बऱ्याचदा आदिवासी समाजातील स्त्रिया ह्या मतदान करण्यासाठी जात नाही. ते मतदानाचा हक्क बजावत नाहीत. परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील मतदान विषयक स्थिती खालील प्रमाणे दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ४.२५**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील मतदाना संबंधीत माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | नियमित मतदान करणारे आदिवासी कुटुंबे | कधी-कधी मतदान करणारे आदिवासी कुटुंब | मतदान न करणारे आदिवासी कुटुंब | एकूण आदिवासी कुटुंब |
|---|---|---|---|---|
| जिंतूर | २५ (६.९४) | ११ (३.०५) | ०४ (१.११) | ४० (११.११) |
| सेलू | २३ (६.३९) | १४ (३.८९) | ०३ (०.८३) | ४० (११.११) |
| मानवत | २९ (८.०५) | १० (२.७८) | ०१ (०.२७) | ४० (११.११) |
| पालम | ३३ (९.१६) | ०५ (१.३९) | ०२ (०.५५) | ४० (११.११) |
| पूर्णा | २७ (७.५) | ११ (३.०५) | ०२ (०.५५) | ४० (११.११) |
| गंगाखेड | ३३ (९.१६) | ०६ (१.६७) | ०१ (०.२७) | ४० (११.११) |
| सोनपेठ | २८ (७.७८) | १२ (३.३३) | ०० (००) | ४० (११.११) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पाथरी | ३१ (८.६१) | ०६ (१.६७) | ०३ (०.८३) | ४० (११.११) |
| परभणी | ३५ (९.७२) | ०५ (१.३९) | ०६ (१.६७) | ४० (११.११) |
| एकूण | २६४ (७३.३३) | ८० (२२.२२) | १६ (४.४५) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत -** प्रत्यक्ष नमुना पाहणी

टीप - कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.२५ वरून असे दिसून येते की, नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी नियमित मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २६४ असून त्याची टक्केवारी ७३.३३ टक्के एवढी आहे. कधी-कधी मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ८० असून त्याची टक्केवारी २२.२२ टक्के एवढी आहे. आणि कधीच मतदान न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १६ असून त्याची टक्केवारी ४.४५ टक्के एवढी आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी २६४ (७३.३३ टक्के) कुटुंब नियमित मतदान करतात. तालुकानिहाय नियमित मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबांचा अभ्यास केला असता सर्वाधिक नियमित मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३५ (९.७२ टक्के) असून ते परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी नियमित मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २३ (६.१६ टक्के) असून ते सेलू तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी कधी कधी मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १४ (३.८९ टक्के) असून ते सेलू तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी कधी-कधी मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची

संख्या ०५ (१.३९ टक्के) असून ते पालम आणि परभणी तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी मतदान न करणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक मतदान न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०६ (१.६७ टक्के) असून ते परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी मतदान न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०१ (०.२७ टक्के) असून ते मानवत आणि गंगाखेड तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात आदिवासी समाजातील लोकांची अशी भावना निर्माण झाली आहे की, मतदान केले किंवा नाही केले तरी काही फायदा होत नाही. यावरून त्यांच्या मतदाना विषयी असणारा दृष्टिकोण स्पष्ट होते.

**४.१५ गोंदण्याच्या प्रथेसंबंधित स्थिती :**

प्राचीन काळापासून आदिवासी समाजातील स्त्रियामध्ये गोंदवून घेण्याची प्रथा आहे. पण काळाच्या ओघात इतर समाजाशी संपर्क वाढल्यामुळे ही प्रथा कमी होताना आढळत आहे. परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजामध्ये गोंदण्याच्या प्रथा विषयी असणारी स्थिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ४.२६**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील गोंदण्याच्या प्रथेसंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | गोंदूण घेतलेले कुटुंबे | गोंदूण न घेतलेले कुटुंबे | एकूण कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | १३ (३.६१) | २७ (७.५) | ४० (११.११) |
| सेलू | १५ (४.१६) | २५ (६.९४) | ४० (११.११) |
| मानवत | ०९ (२.५) | ३१ (८.६१) | ४० (११.११) |
| पालम | १२ (३.३३) | २८ (७.७७) | ४० (११.११) |
| पूर्णा | १० (२.७७) | ३० (८.३३) | ४० (११.११) |
| गंगाखेड | ११ (३.०५) | २९ (८.०५) | ४० (११.११) |
| सोनपेठ | ०८ (२.२२) | ३२ (८.८८) | ४० (११.११) |

| | | | |
|---|---|---|---|
| पाथरी | १३ (३.६१) | २७ (७.५) | ४० (११.११) |
| परभणी | ०७ (१.९४) | ३३ (९.१६) | ४० (११.११) |
| एकूण | ९८ (२७.२२) | २६२ (७३.७८) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप** - कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.२६ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील गोंदण्याच्या प्रथेविषयी माहिती दर्शविण्यात आली आहे. नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी ९८ (२७.२२ टक्के) आदिवासी कुटुंबातील स्त्रियांनी गोंदवून घेतले आहे. तर गोंदून न घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २६२ असून त्यांची टक्केवारी ७२.७८ टक्के एवढी आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी ९८ (२७.२२ टक्के) आदिवासी कुटुंबांतील स्त्रियांनी गोंदवून घेतले असून तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक गोंदवून घेणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या १५ (४.१६ टक्के) असून ते सेलू तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी गोंदवून घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०७ (१.९४ टक्के) असून ते परभणी तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी २६२ (७३.७८ टक्के) कुटुंबातील स्त्रियांनी गोंदवून घेतलेले नसून तालुकानिहाय वर्गीकरण केले असता सर्वाधिक गोंदवून न घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३३ (९.१६ टक्के) असून ते परभणी तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी गोंदवून न घेणारे आदिवासी कुटुंबांची संख्या २५ (६.९४ टक्के) असून ते सेलू तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात आजच्या या आधुनिक काळामध्ये शिक्षणाचा प्रभावाने आदिवासी मुली या गोंदवून घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे आदिवासी समाजातील ही प्रथा कालबाह्य होत असल्याचे दिसून येते.